सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुंबई-एमएमआरमध्ये पुढील 15 वर्षांत 30 लाख घरे बांधणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा; सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टरचे भूमिपूजन

**मुंबई :** मुंबईसह महानगर प्रदेशातील घरांची वाढती गरज लक्षात घेऊन पुढील १५ ते २० वर्षांत ३० लाख घरे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी केली. मुंबईसह ठाणे, मीरा-भाईंदर, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आदी शहरांमध्ये क्लस्टर पुनर्विकासाला चालना देण्याचे सरकारचे धोरण असून, युनिफाइड डीसीपीआरमधील बदलांमुळे क्लस्टर आणि एसआरए प्रकल्पांना गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. ठाणे महापालिकेच्या सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टर योजनेच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. एमएमआरमध्ये ३० लाख घरांचे नियोजन यापूर्वीही शिंदे यांनी जाहीर केले असून, त्यात मुंबईत १० लाख आणि एमएमआरच्या अन्य भागांत २० लाख घरांचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सुमारे २० हेक्टर अर्थात ५० एकर परिसरात विकसित होणाऱ्या सिद्धेश्वर नगर-रमाबाई नगर क्लस्टरमुळे ठाण्यातील सुमारे सहा हजार कुटुंबांना सुरक्षित आणि दर्जेदार घरे मिळणार आहेत. निवासी इमारती उभारण्याबरोबरच २३ प्रकारच्या नागरी सुविधा, रोजगाराच्या संधी आणि नियोजित टाऊनशिप उभारून 'नवे ठाणे' साकारण्याचे नियोजन असल्याचे शिंदे यांनी सांगितले. ठाणे क्लस्टर योजनेत मोडकळीस आलेल्या इमारती, चाळी आणि झोपडपट्ट्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्याची संकल्पना आहे.

या प्रकल्पात रुंद रस्ते, मुबलक पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, उद्याने, मैदाने, कम्युनिटी हॉल, जिम्नॅशियम, योग केंद्र, इनडोअर गेम्स, डिजिटल लायब्ररी, डे-केअर सेंटर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, महिला सक्षमीकरण केंद्र आणि स्मार्ट स्ट्रीट लाइटिंग अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'सिटी विथिन द सिटी' या संकल्पनेतून हा विकास केला जाणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.ठाण्यातील धोकादायक इमारतींच्या प्रश्नाचा संदर्भ देताना शिंदे



यांनी क्लस्टर योजनेचा प्रवास सुमारे २० वर्षांच्या संघर्षातून पुढे आल्याचे नमूद केले. किसननगरमधील साईराज इमारत दुर्घटनेसह विविध दुर्घटनांनंतर धोकादायक इमारतींच्या प्रश्नावर उपोषणे, मोर्चे आणि विधानसभेत आवाज उठविला. नगरविकास मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून धोरणात्मक अडथळे दूर करून क्लस्टर योजना प्रत्यक्षात आणल्याचे त्यांनी सांगितले. किसननगरमधील पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाकडे असून, लवकरच रहिवाशांना घरांच्या चाव्या देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. ठाणे महापालिकेने क्लस्टर विकासासाठी 'क्लस्टर विकास कंपनी' स्थापन केली असून, ५० नागरी पुनरुत्थान आराखड्यांपैकी १२ आराखड्यांना मंजुरी मिळाली आहे.

'वॉक टू वर्क' संकल्पना

क्लस्टरमध्ये निवासी बांधकामासोबत व्यावसायिक विकास आणि स्थानिक रोजगारनिर्मितीवरही भर देण्यात येणार आहे. 'वॉक टू वर्क' संकल्पनेतून घराजवळच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली. सिद्धेश्वर तलावाचा पुनर्विकास, स्वच्छता आणि सुशोभीकरण करून तलावाला मोकळा श्वास मिळवून देण्याचेही त्यांनी सांगितले. - रहिवाशांच्या मागण्यांबाबत कॉर्पस फंड, अतिरिक्त १०० चौरस फुटांची जागा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे आणि छोट्या दुकानदारांच्या पुनर्वसनाचा विचार करण्याचे संकेत शिंदे यांनी दिले. विकासकांनी नफा कमी झाला तरी चालेल, मात्र घरांच्या दर्जात तडजोड करू नये, अशी सूचना त्यांनी केली. सरकार आणि महापालिकेकडून आवश्यक सहकार्य देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# बैजयंत पांडा भाजपचे नवे महाराष्ट्र प्रभारी

## तावडे, सहस्त्रबुद्धे, भरती पवार, मेधा कुलकर्णी यांच्याकडेही विविध राज्यांची जबाबदारी

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने बुधवारी पक्षाच्या राज्यनिहाय प्रभारी आणि सहप्रभारींच्या नियुक्त्यांमध्ये फेरबदल केले. यामध्ये महाराष्ट्राच्या प्रभारीपदाची जबाबदारी राज्यसभा खासदार आणि भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बैजयंत जय पांडा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. त्यांच्या मदतीला अमित मालवीय, गोव्याचे राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे आणि दिल्लीच्या खासदार कमलजीत सहरावत यांची सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी पक्षाच्या संघटनात्मक पुनर्रचनेचा भाग म्हणून या नियुक्त्या जाहीर केल्या. देशातील २८ राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेशांसाठी प्रभारी व सहप्रभारींची नवी रचना करण्यात आली आहे. काही राज्यांतील आगामी विधानसभा



निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक यंत्रणेत बदल करण्यात आल्याचे या फेरबदलातून स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्रासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नव्या टीममध्ये पांडा यांच्यासह अमित मालवीय, सदानंद शेट तानावडे आणि कमलजीत सहरावत यांचा समावेश आहे. पांडा यांच्यावर महाराष्ट्राच्या संघटनेची प्रमुख जबाबदारी राहणार असून तीन सहप्रभारी त्यांना साथ देतील. या फेरबदलात महाराष्ट्रातील नेत्यांनाही राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशचे प्रभारीपद कायम ठेवण्यात आले असून, पुण्याच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांची उत्तर प्रदेशच्या सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राज्यसभा खासदार भारती पवार यांच्याकडे गोव्याच्या प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्राबरोबरच दिल्लीच्या प्रभारीपदाची जबाबदारी डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्याकडे देण्यात आली आहे. हरियाणा आणि छत्तीसगडची जबाबदारी स्मृती इराणी यांच्याकडे, तर तमिळनाडू आणि उत्तराखंडची जबाबदारी राम माधव यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. बिहार आणि कर्नाटकसाठी हरीश द्विवेदी, जम्मू-काश्मीर आणि पंजाबसाठी सतीश पुनिया, तर तेलंगणा आणि पश्चिम बंगालसाठी सुनील बन्सल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# राज्यातील भजनी मंडळांना अनुदानाची योजना, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु

**मुंबई :** राज्यातील लोककलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या अनुदान पॅकेजअंतर्गत भजनी मंडळांना अनुदान देण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्य विभागाने घेतला आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी समारे २ हजार भजनी मंडळांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी बुधवारी केली.

महाराष्ट्रातील पात्र भजनी मंडळांना या योजनेचा लाभ मिळणार असून, अर्ज प्रक्रिया केवळ ऑनलाइन पद्धतीने mahaanudan.org या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. पात्र मंडळांची निवड 'प्रथम अर्ज – प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे. या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत २३ सप्टेंबर २०२६ ते २२ ऑक्टोबर २०२६ अशी आहे. पात्र भजनी मंडळांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले आहे.

पात्रतेचे निकष काय?

- एका वर्षात किमान ४० कार्यक्रम सादर करणारे व पूर्ण वेळ व्यवसाय करणारे भजनी मंडळ असावे. - भजनी मंडळामध्ये किमान १५ सदस्य असावेत. - एकदा अनुदान मिळाल्यानंतर संबंधित संस्था किमान ३ वर्षांनंतर पुन्हा अनुदानासाठी अर्ज करू शकते. - एका पथकास या अनुदानाचा लाभ जास्तीत जास्त दोन वेळा अनुज्ञेय असेल.

# जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची बाबरा येथे अचानक भेट; निष्काळजीपणावर कडक कारवाईचा इशारा

## कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही! बाबरा येथील पाहणीनंतर जि. प. प्रशासनाचा कडक इशारा

फुलंब्री, दि.२१ सप्टेंबर,
प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मित्रू पी. एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके,जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे आणि उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल,गटविकास अधिकारी प्रसाद खेडकर यांनी मंगळवारी (दि. २२) सकाळी बाबरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी व इतर शासकीय कार्यालये येथे अचानक भेट देऊन पाहणी केली. या अचानक झालेल्या दौऱ्यामुळे स्थानिक प्रशासन व कर्मचाऱ्यांची चांगलीच धांदल



उडाली. या पाहणीदरम्यान स्वच्छतेचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसून आला.व मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

मंगळवारी सकाळी अचानक जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा ताफा बाबरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाला. या वेळी आरोग्य केंद्रातील स्वच्छता, औषध साठा, कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि पाहणीदरम्यान येथे सर्व सोयीसुविधा व स्वच्छता चांगली असल्याने आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा करण्यात आली.

यानंतर अधिकाऱ्यांनी लागलीच बाबरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट दिली. तेथे विद्यार्थ्यांची उपस्थिती, पोषण आहार, शैक्षणिक गुणवत्ता आणि शाळा परिसराची पाहणी करण्यात आली. तेथेही स्वच्छता सोयी-सुविधा आणि व्यवस्थापनाबाबत अनेक त्रुटी समोर आल्या.या भेटीनंतर जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित विभागातील जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना कडक शब्दात समज दिली असून, आढळलेल्या त्रुटींवर तत्काळ सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. कामात निष्काळजीपणा करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल, असा इशाराही या वेळी देण्यात आला. या अचानक झालेल्या तपासणीमुळे तालुक्यातील इतर शासकीय कार्यालये व शाळांमध्येही

# बाप्पाच्या मिरवणुकीत डीजे-फटाके वाजवणार असाल तर सावधान..

**मुंबई:** महाराष्ट्रात सध्या गणेशोत्सवाचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जात आहे. मात्र, याच उत्सवाच्या वातावरणात ध्वनिप्रदूषण आणि वायू प्रदूषणाची गंभीर समस्या ऐरणीवर आली असून, यावर अंकुश ठेवण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत कडक पावले उचलली आहेत. सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यावर न्यायालयाने पूर्णपणे बंदी घातली असून, डीजे (DJ) आणि लेझर लाईट्सच्या (Laser Lights) अतिवापरावरही कठोर ताशेरे ओढले आहेत. "उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवले जाऊ शकत नाहीत," असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला आहे.

**उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय :** न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्वतःहून दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेवर (Suo Motu PIL) हा महत्त्वपूर्ण निर्णय सुनावला आहे. राज्य सरकारने न्यायालयात सर्वकाही सुरळीत असल्याचा दावा केला होता, परंतु प्रत्यक्षात नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. "काही लोकांच्या गैरवर्तनामुळे निष्पाप नागरिकांना त्रास सहन करावा लागू शकत नाही," असे खडे बोलही न्यायालयाने सुनावले.मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये हाय-वॉट स्पीकर्स आणि ढोल-ताशांच्या अतिवापरामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, असे नमूद करत न्यायालयाने मिरवणुका अधिक सनदशीर आणि सन्मानजनक पद्धतीने काढण्याची गरज व्यक्त केली.

# राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेतेपद फार काळ रिक्त न ठेवता त्या पदावर आ रोहित पवार यांची नियुक्ती करावी

## विधानसभा अध्यक्ष व मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद अधिक काळ रिक्त ठेवू नये तसेच या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नावाचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेलद्वारे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री ललवाणी यांनी म्हटले आहे की, सन 2024 च्या विधानसभा निवडणुकीनंतर विधानसभेत अधिकृत विरोधी पक्षनेतेपद रिक्त असून सक्षम लोकशाही आणि संसदीय उत्तरदायित्वासाठी हे पद अतिशय महत्त्वाचे आहे.

विरोधी पक्षनेत्याची भूमिका केवळ सरकारवर टीका करण्यापुरती मर्यादित नसून, शासनाच्या कामकाजावर संसदीय देखरेख ठेवणे, जनतेचे प्रश्न सभागृहात मांडणे, शासनाला उत्तरदायी ठेवणे तसेच विविध धोरणांवर विधायक चर्चा घडवून आणणे ही या पदाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित पवार हे तरुण, सक्रिय आणि अभ्यासू आमदार असून शेतकरी, युवक, विद्यार्थी, महिला, रोजगार, शिक्षण, उद्योग तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर ते सातत्याने शासनाचे लक्ष वेधून घेत आहेत. त्यांच्या संसदीय सक्रियतेचा आणि जनतेच्या प्रश्नांवरील भूमिकेचा विचार करता ते विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडू शकतील, असेही निवेदनात म्हटले आहे.

विरोधी पक्षनेतेपद हे कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा पक्षाचे वैयक्तिक पद नसून, सत्तेचे उत्तरदायित्व आणि जनतेच्या प्रश्नांची प्रभावी संसदीय मांडणी यासाठी महत्त्वाचे संस्थात्मक पद असल्याचे श्री ललवाणी यांनी निवेदनात म्हटले आहे.

The Leaders of Opposition in Maharashtra Legislature Salaries and Allowances Act, 1978 तसेच विधानसभा नियम आणि संसदीय परंपरांचा विचार करून विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय घ्यावा, केवळ संसदीय प्रथा किंवा परंपरेच्या आधारे पद रिक्त ठेवण्याऐवजी प्रचलित कायदा आणि विधानसभा अध्यक्षांना प्राप्त अधिकारांच्या आधारे विधानसभा विरोधी पक्षनेता निवडीबाबत निर्णय घेण्यात यावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

# पुण्यातील गणोशोत्सवानिमित्त वाहतुकीत बदल नक्की तपासा

**पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मोठे बदल जाहीर केले आहेत. 25 सप्टेंबर रोजी सकाळपासून विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत शहरातील 17 प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच 24 सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजल्यापासून विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर नो-पार्किंग लागू करण्यात येणार आहे.

विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती भागात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्था लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता इतर वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

या प्रमुख मार्गावर वाहतूक राहिल बंद

शहरातील छत्रपती शिवाजी रोड, लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, कुमठेकर रोड, गणेश रोड, केळकर रोड, टिळक रोड, शास्त्री रोड, जंगली महाराज रोड, कर्वे रोड, फर्ग्युसन रोड, भांडारकर रस्ता, पुणे-सातारा रोड, सोलापूर रोड, प्रभात रोड, बागाडे रोड आणि गुरु नानक रोड या 17 प्रमुख मार्गांवर वाहतूक बंद राहणार आहे.

या काळात जंगली महाराज रोडवरील झाशी राणी चौक, शिवाजी रोडवरील काकासाहेब गाडगीळ पुतळा, लक्ष्मी रोडवरील संत कबीर चौकी, सोलापूर रोडवरील सेव्हन लव्हज चौक, सातारा रोडवरील व्होल्गा चौक, कर्वे रोडवरील नळ स्टॉप आणि फर्ग्युसन रोडवरील गुडलक चौक यांसह विविध ठिकाणी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली जाणार आहे.

# सणासुदीत भेसळमुक्त अन्नासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

## नागरिकांनी अन्नपदार्थांबाबत अनाठायी भीती बाळगू नये

**अहिल्यानगर :** सणासुदीच्या काळात नागरिकांना भेसळमुक्त व शुद्ध अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. भेसळखोरांवर अन्न व औषध प्रशासनासह जिल्हा प्रशासनाची करडी नजर असून, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले.

जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या माध्यम संवाद उपक्रमांतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या कामगिरीबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.डॉ. आशिया




म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा दूध उत्पादनात अग्रेसर असल्याने दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळीला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून वेळोवेळी कठोर कारवाया करण्यात येतात. नागरिकांना निर्भेळ दूध उपलब्ध व्हावे, यासाठी सर्व योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत. दूध भेसळीविरोधातील कारवाईनंतरही दूध उत्पादन व पुरवठ्यात फारशी तूट आलेली नाही. तसेच कारवाईदरम्यान दूध भेसळीचे फारसे प्रकार आढळून आलेले नाहीत. नाममात्र प्रकरणांमध्ये भेसळखोरांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**अन्नपदार्थांबाबत अनाठायी भीती नको :** भेसळमुक्त व शुद्ध अन्नपदार्थ नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. मात्र, नागरिकांनी उपलब्ध अन्नपदार्थांबाबत नेहमीच साशंक राहू नये किंवा प्रत्येक पदार्थ भेसळयुक्त असल्याची भीती मनात बाळगू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी केले.

यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाभरात भेसळखोरांविरुद्ध करण्यात आलेल्या कारवाईची आकडेवारीसह माहिती पत्रकारांना दिली.

# पैठणच्या सुवर्ण इतिहासाची रोमांचकारी सफर; पालथी नगरीत परत उत्खनन करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

**पैठण दि २३ :** पैठणच्या वैभवशाली इतिहासाची नव्या पिढीला ओळख करून देण्यासाठी 'हिस्टरी टॉक अँड हेरिटेज साईड्ढ' या विशेष उपक्रमाचे आयोजन नागघाट मंदिर, पैठण येथे करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व इतिहासप्रेमींना पैठणच्या प्राचीन इतिहासाची रोमांचकारी सफर घडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेखाताई कुलकर्णी,भाजपा प्रदेश उपध्यक्षा या होत्या पैठणच्या इतिहासाच्या अनुषंगाने पैठणचा समग्र इतिहास या विषयावर जयवंत पाटील यांनी विचार व्यक्त केले तर सम्राट सातवाहन वंश आणि पैठण यावर प्रा.संतोष गव्हाणे तर चक्रधर स्वामी यांच्या काळातील पैठण या ऐतिहासिक विषयावर प्रा.हंसराज जाधव यांनी विचार व्यक्त केले

पैठणचे सुपुत्र, अधिकारी, लेखक व इतिहास संशोधक जयवंत पाटील होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय पैठणच्या इतिहासाचा सविस्तर व अभ्यासपूर्ण आढावा घेतला. पुरातन प्रतिष्ठान, सातवाहन ,चक्रधर स्वामी, संत एकनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज,राजर्षी शाहू महाराज, भोगनारायण मंदिर, हडप्पा-




मोहेंजोदडो संस्कृतीचे संदर्भ, पालथी नगरी, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक, नवनाथ परंपरा, तीर्थखांब, सिद्धेश्वर मंदिर, जालिंदरनाथ मठ व देवनाथ मंदिर आदी विषयांवर त्यांनी माहिती दिली.

'वैभवशाली इतिहासाचा वारसा लाभलेली आणि जगातील नामांकित नगरांनाही हेवा वाटावा अशी दिमाखदार नगरी म्हणजे प्राचीन प्रतिष्ठान अर्थात आजचे पैठण,' असे सांगत जयवंत पाटील यांनी पैठणच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकला.

सुमारे चारशे साठ वर्ष राज्य केलेल्या व सम्राट पदावर पोहचलेला परंतु दुर्लक्षित असलेल्या सातवाहन काळातील तीस राजांची माहिती देत असताना उज्जियन ते आंध्र प्रदेश

या मोठ्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या या राजवटीत असलेला विविध देशांशी असलेला व्यापार नागणिका सातवाहन या राणीच्या काळातील नाणे घाट येथील शिलालेख ते तेर ढोकी ,भोगवर्धन आदी संदर्भ देत सातवाहनाचा इतिहास प्रा.संतोष गव्हाणे यांनी उलगडला


चक्रधर स्वामी यांच्या काळातील पैठण,घाट महानुभाव पंथाची स्थापना,वास्तव्य आदि बाबत प्रा.हंसराज जाधव यांनी माहिती दिली

आजच्या तरुण पिढीला आपल्या शहराचा इतिहास समजावा, ऐतिहासिक स्थळांची माहिती व्हावी आणि वारसा संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन बालगोपाळ गणेश मंडळ,प्रतिष्ठान पुस्तक प्रकाशक समिती,ताराई महाविद्यालय, श्री नाथ हायस्कूल,आइकॉन पैराडाइस स्कूल,आदिशक्ती महिला नागरी पतसंस्था, आदींच्या सहकार्याने करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी पैठणच्या इतिहासाबाबत विविध प्रश्न विचारले. या प्रश्नांना जयवंत पाटील यांनी सविस्तर उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे समाधान केले.याप्रसंगी होणार रेखाताई कुलकर्णी, दिनेश पारिख, उपनगराध्यक्ष तुषार पाटील व शिवाजी गाडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास नगरसेवक गोवर्धन टाक, गणेश वरकड, शिवा पारिख,उदय सुलाखे, प्रा. राजेश करपे, जालिंदर फलके, आतिष गायकवाड, सुनील पायघन, मदन आव्हाड,दादासाहेब घोडके,उमेश तट्टू, सचिन उंडाळे, भूषण रावस, सुनील मडके,सुधीर रावस,बाळू जोमदे ,प्राचार्य रामदास रामावत, रामदास तांगडे,जालिंदर येवले, खलिल धांडे,तसेच पैठण दुर्ग प्रतिष्ठान, बालगोपाल गणेश मंडळ, सुतारपार, ताराई महाविद्यालय, आयकॉन पॅराडाईजचे विद्यार्थी नाथ हायस्कूल विद्यार्थी आणि बहुसंख्य इतिहासप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## कायदा आणि सुव्यवस्थेचे काटेकोर पने पालन करून गणेश विसर्जन शांततेत करा...सपोनि विजय नरवडे

**बीड :** बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलिस ठाण्याअंतर्गत असणार्या गावात एक गाव एक गणपती बसवण्यात आले असुन गावात शांतता कमिटीची बैठक घेऊन कायदा आणि सुव्यवस्थेचे काटेकोर पने पालन करून गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडुन पोलिस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनी विजय नरवडे यांनी ग्रामस्थांनी बोलताना केले.



बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलिस ठाण्याअंतर्गत असणार्या गावात शांतता आणि सलोखा अबाधित ठेवण्यासाठी एक गाव एक गणपती बसविण्यात आले आहेत कायदा आणि सुव्यवस्थाचे काटेकोरपणे पालन करून पोलिस अधिक्षक आणि पोलिस उप अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडुन लोकांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनी विजय नरवडे यांनी बोरफडी हिवरा पहाडी कुटे वाडी जरूड नाळवंडी ईट नाथापुर घाटसावळी ढेकणमोहा या परीसरातील गावासी भेटी देऊन लोकासी बोलतांना केले

## चोरीच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**बीड :** बीड येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी आरोपी सुशांत मुंडे याची निर्दोष मुक्ता केली

दिनांक ९/१० /२९१८ रोजी फिर्यादी याची स्प्लेंडर कंपनीची गाडी चोरीला गेल्या बाबत ची फिर्याद बीड येथील शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा र .नंबर २१५/२०१८ दाखल झाली होती मुख्य न्याय दंडाधिकारी बीड येथे दोषारोप पत्र दाखल झाल्यानंतर आर सी सी न.३४५/२०१९ मध्ये फिर्यादी पक्षाच्या साक्षापुराव्या नंतर आरोपी सुशांत मुंडे याची मुख्य न्याय दंडाधिकारी बीड यांनी निर्दोष मुक्ता केली या प्रकरणात आरोपी तर्फे अँड.एस.आर. नागरगोजे व यांनी काम पाहिले त्यांना अँड अरविंद पाटील व अँड.छाया कांबळे यांनी सहकार्य केले .

## त्रिमूर्ती गणेश मंडळ केजच्या वतीने रक्तदान शिबिर; रक्तदानास महिलाचा उस्फूर्त प्रतिसाद

**केज :** केज शहरातील मंगळवार पेठ येथील मानाचा गणपती असलेला केजचा चिंतामणी "त्रिमूर्ती " गणेश मंडळ नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मंडळाने विविध पारितोषिक जिंकलेले आहेत मंडळाच्या सामाजिक कार्याचा भाग म्हणून दि. २०-९-२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन मंडळाचे सागर नाईकवाडे यांच्या हस्ते झाले या यामध्ये सुमारे २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले यात प्रामुख्याने सागर नाईकवाडे, अक्षय नाईकवाडे, सुरज नाईकवाडे, दीपक नाईकवाडे, आयर्न नाईकवाडे, सार्थक नाईकवाडे, आयुष नाईकवाडे, विशाल नाईकवाडे, महारुद्र हलगे, वैजनाथ हलगे, शिवराज पाटील, बाबासाहेब काकडे सह महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवत अश्विनी नाईकवाडे, माधुरी नाईकवाडे, सिंधू नाईकवाडे, विद्या नाईकवाडे, प्रीती कदम इत्यादीने रक्तदान केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष मनोज नाईकवाडे, उपाध्यक्ष सागर नाईकवाडे, सचिन नाईकवाडे, अक्षय नाईकवाडे इत्यादीने परिश्रम घेतले. शासकीय रक्त संकलन बीड यांनी या शिबिरात सहकार्य केले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना अनेक संधी : अधिष्ठाता डॉ. अझरुद्दीन

### सावरकर महाविद्यालयात 'अकॅडमी बँक क्रेडिट'वर कार्यशाळा

बीड ( प्रतिनिधी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून तयार करण्यात आले असून यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांचे भवितव्य घडवण्यासाठी अनेक संधी आहेत असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता डॉ. सय्यद अझरुद्दीन यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड यांचे संयुक्त विद्यमाने आज आज दि.22 सप्टेंबर 2026 रोजी बीडमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र अलूरकर हे होते. या वेळी व्यासपीठावर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, प्राचार्य संजय चाकणे, वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. गणेश काथार, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अरविंद रायलवार यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. अझरुद्दीन म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला अकॅडमी बँक क्रेडिटची सोय करून दिली आहे. मल्टिपल एन्ट्री आणि एक्झिट याचे महत्व त्यांनी समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना आवडीचे विषय निवडण्याची संधी आहे असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य विकासाला महत्त्व देण्यात आले आहे यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात मोठ्या संधी उपलब्ध होतील.

## “कडा-नेकनूर अपर तहसील कार्यालयांमुळे नागरिकांच्या महसुली कामांना गती मिळणार”

### जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांची माहिती

**बीड, दि. २३ (प्रतिनिधी) :** कडा आणि नेकनूर येथे अपर तहसीलदार कार्यालये कार्यान्वित करण्यास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली असून, या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना महसुली सेवा अधिक सुलभ आणि गतिमान पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करताना “कडा आणि नेकनूर अपर तहसील कार्यालयांमुळे नागरिकांच्या महसुली कामांना गती मिळणार असून, प्रशासन आता नागरिकांच्या अधिक जवळ येईल,” अशी प्रतिक्रिया भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी प्रस्तुत निवेदनाद्वारे दिली.

महसूल विभागाच्या दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कडा आणि नेकनूर येथे अपर तहसीलदार कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. कडा अपर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कडा, दौलावडगाव, पिंपळा, धानोरा आणि दादेगाव या पाच महसूल मंडळांचा समावेश करण्यात आला आहे. तर नेकनूर अपर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नेकनूर, येळंबघाट, मांजरसुंभा, चौसाळा आणि लिंबागणेश या पाच महसूल मंडळांचा समावेश करण्यात आला आहे.

या दोन्ही कार्यालयांमुळे नागरिकांची महसुली कामे अधिक सुलभ होण्याबरोबरच प्रशासनाशी संबंधित कामांसाठी होणारी धावपळ कमी होईल. स्थानिक पातळीवर महसुली सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, कडा आणि नेकनूर परिसराच्या प्रशासकीय विकासाला यामुळे नवी दिशा मिळेल, असे देशमुख यांनी नमूद केले.

## माजलगाव बाजार समिती शेतक-यांच्या जिव्हाळ्याची संस्था- रमेश घुले

### माजलगाव बाजार समिती आवारामध्ये शेतक-यांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



**माजलगाव, दि. 23 प्रतिनिधी:** राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे चे संचालक मिलिदजी अकरे साहेब यांच्या सूचनेवरून व उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बाजार समितीच्या फुलेपिंपळगाव बाजार आवारात दि. 23 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 11 ते 5.00 या वेळेत एक दिवसीय शेतकरी कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

यावेळी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे संस्थेचे बाजार समिती विभाग व्यवस्थापक रमेश घुले, कृषी विज्ञान प्रमुख हनुमान गरूड, डॉ. तुकेश सुरफान, डॉ. भैय्यासाहेब गायकवाड, प्रशासन विभागाचे राजेश नाफडे, मार्केटींग व्यवस्थापक संतोष डोईफोडे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, संचालक प्रभाकर होके, संजय कचरे, सचिव हरिभाउ सवणे, सहाय्यक सचिव रविंद्र नाईकनवरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना संस्थेचे बाजार समिती विभागाचे व्यवस्थापक रमेश घुले म्हणाले की, शेतक-यांनी माती व पाणीपरिक्षण करणे गरजेचे असुन बाजार समिती टिकविण्यासाठी शेतक-यांनी आपला शेतीमाल बाजार समितीच्या आवारातच विक्री करावा. बाजार समिती शेतक-यांच्या जिव्हाळ्याची संस्था असल्याचे त्यांनी सांगीतले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख हनुमान गरूड यांनी उत्पादन खर्च कमी करायचा आणि उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे. जमिनीचा सेंद्रीय कर्ब प्रमाण किती याची तपासणी करावी आणि अतिरिक्त पाणी देणे देखिल टाळावे. विषय विशेष तज्ञ डॉ. तुकेश सुरफान यांनी शेतक-यांनी शेतीतील खर्च कमी करण्यासाठी गटशेतीकडे वळावे आणि शासनाच्या विवीध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. किटकनाशक तज्ञ डॉ. भैय्यासाहेब गायकवाड यांनी दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, जिवामृत आणि बायोमिक्स सारख्या जैविक निवीष्ठांचा वापर करावा असे आवाहन केले. आभार प्रदर्शनात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी उपस्थित शेतक-यांना नैसर्गिक शेतीकडे वळा आणि संस्थेने प्रत्येक तिन महिण्याला बाजार समितीमध्ये ही कार्यशाळा घ्यावी असे आवाहन केले. सुत्रसंचालन कनिष्ठ लिपीक सिध्देश्वर येवले यांनी केले. यावेळी कार्यशाळेला उपस्थित शेतक-

## विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरी करणारे सराईत आरोपी जेरबंद

**केज/प्रतिनीधी :** गुन्ह्यांचा तपशील / गु.र.नं.अ.क्र. पोलीस ठाणे गु.र.नं. व कलम फिर्यादी केज 375/2025 कलम 303 (2) केज 376/2025 कलम 303 (2) BNS महादेव बाबुराव इंगळे रा. शिवाजीनगर कंळब रोड केज. ता.केज जि.बीड केज 398/2025 कलम 331(4),305(a) BNS बालासाहेब कुंडलीक गायकवाड रा.मस्साजोग ता.केज जि.बीड केज रोड केज ता.केज जि.बीड क्र 5 युसुफ वडगाव 194/2025 कलम 303 (2) BNS अभिजीत रतन साखरे रा.आवसगाव ता.केज बीड कळंब 193/2026 कलम 3,25 शस्त्र अधिनियम, 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 अमोल गंगाराम चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव घटना व ठिकाण दिनांक व वेळ दि.20/09/2026 रोजी दुपारी 12 ते 14 दरम्यान.ठिकाण मौजे कन्हेरवाडी ता.कळंब जि.धाराशिव.माहिती कशी प्राप्त झाली गोपनीय बातमीदारा मार्फत.आरोपीची माहिती विशाल उर्फ मम्डया बालाजी काळे, रा. कन्हेरवाडी ता.कळंब जि.धाराशीव गुन्ह्याची थोडक्यात हकीकत

दिनांक 20/09/2026 रोजी केज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल सुर्यतळ साहेब यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, पोलीस ठाणे केज येथे विविध चोरीच्या गुन्ह्यात पाहिजे असलेला फरार सराईत गुन्हेगार विशाल उर्फ मम्डया बालाजी काळे रा.कन्हरवाडी ता.कळंब जि.धाराशीव येथे त्याच्या घरी बसलेला आहे अशी माहिती मिळाल्याने पोनि सुर्यतळ यांच्या आदेशाने तात्काळ डी.बी. पथक घटनास्थळी रवाना झाले. पोलीस पथकास पाहून आरोपी पळून जात असताना त्याचा मोठ्या शिताफीने पाठलाग करून चोरट्यास जेरबंद केले.मार्गदर्शक व कारवाई करणारे पथक.मार्गदर्शक मा. नवनीत कॉवत (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, बीड. श्रीमती चेतना तिडके (म.पो.से.) अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई.. वेंकटराम (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग केज. राहुल कामाजी सुर्यतळ, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे .

## अध्यापक विकास प्रशिक्षण एक दिवशीय कार्यशाळा संपन्न



**बीड :** दिनांक 23 सप्टेंबर 2026 रोजी कर्मचारी समन्वय समिती व एम एस एफ डी ए अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून श्री प्रतीक धमाल, मॅनेजर, श्री राहुल पोखरकर,सहाय्यक श्री आकाश वाडकर,कार्यक्रम समन्वयक यांची उपस्थिती होती. साधन व्यक्तींनी अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील अध्यापकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन केले. अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नोंदणी कशी करावी, कोण कोणत्या प्रकारचे कोर्स उपलब्ध आहेत याची माहिती श्री प्रतीक धमाल यांनी दिली. तसेच महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची स्थापनेपासून ची माहिती व या प्रशिक्षण संस्थेचा उद्देश याबाबत सहाय्यक श्री राहुल पोखरकर यांनी पीपीटी द्वारे व व्हिडिओ क्लिप द्वारे प्रेझेंटेशन केले. या कोर्ससाठी असणारी नियम व पात्रता कोर्स साठी असणारी फीस ही सर्व माहिती श्री आकाश वाडकर यांनी दिली. महाराष्ट्र राज्यातील विविध महाविद्यालयातून कायम व तासिका तत्वावर तसेच कॉन्ट्रॅक्ट व तदर्थ स्वरूपात नियुक्त प्राध्यापक या कोर्ससाठी पात्र असून सर्वांनी या कोर्ससाठी प्रवेश घ्यावा. असे आव्हान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे व मॅनेजर श्री प्रतीक धमाल यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ रमेश खंडागळे, व सर्व सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्टाफ सेक्रेटरी, प्रा. संजय काळे यांनी केले. डॉ अरविंद रायलवार यांनी प्रशिक्षण कार्यशाळेची माहिती मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार कर्मचारी समन्वय समितीचे सदस्य डॉ. गोपाळ धोंड यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप कल्याण मंत्राने झाला.

## के.एस.पी. विद्यालय, बीड येथे ‘पर्यावरणपूरक गणपती बनवणे’ भव्य स्पर्धेचे आयोजन!

**बीड (प्रतिनिधी) :** कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालय बीड येथे खास माता-पालकांसाठी 'पर्यावरणपूरक गणपती बनवणे' या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी शाळेतील इयत्ता 1 ली ते 10 वी मधील विद्यार्थ्यांच्या पालकांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच पर्यावरणाचे रक्षण आणि संस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवला आला. पर्यावरणपूरक गणपती (Eco-friendly Ganpati) बनवणे ही काळाची गरज आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) मुळे पाण्याचे प्रदूषण होते, तर शाडूच्या मातीचे किंवा इतर नैसर्गिक गणेशमूर्ती पाण्यात सहज विरघळतात. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आणि आपल्या हाताने गणपती साकारण्यासाठी शाळेच्या वतीने सर्व माता-पालकांचा या स्पर्धेत मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेसाठी प्रथम रु. ५००१/-, द्वितीय रु ३००१/-,तृतीय रु.२००१/- आकर्षक बक्षीसे ठेवण्यात आले होते. तसेच दहा पालकांना उत्तेजनार्थ पारितोषिक ठेवण्यात आले. सर्व सहभागी माता-पालकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. यामध्ये प्रथम पारितोषिक कु. शेख जुनेरा इयत्ता 2 री मधील मुलीच्या माता-पालकास मिळाले. व्दितीय पारितोषिक कु. खाडे अन्विता इयत्ता 9 वी मधील मुलीच्या माता- पालकास मिळाले. तसेच तृतीय पारितोषिक कु.जावळे अरपिता इयत्ता 7 वी या माता-पालकास मिळाले. या स्पर्धेचे परीक्षण श्रीमती केंडे मॅडम व श्रीमती पुजा जैन मॅडम यांनी केले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य.) तसेच संस्थाध्यक्षा सौ. अंजलीताई शेळके, श्री. तनयकुमार शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्पर्धे यशस्वी पार पाडण्याकरिता शाळेचे प्र. मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण यातूनच उन्नती व उत्कर्ष - डॉ. श्रीमती वृषाली किन्हाळकर



**अंबाजोगाई:** महिला सबलीकरण व सक्षमीकरण महिलांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी पुरक असून यातूच उत्कर्ष व उन्नती होईल असे मत प्रख्यात लेखिका डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी व्यक्त केले. योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी गणेशोत्सव व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष जी.बी.व्यास होते. पुढे बोलताना डॉ. किन्हाळकर म्हणाल्या की,सक्षमीकरण व सबलीकरण या दोन्हीही गोष्टी अनिवार्य आहेत. पायाभूत सुविधा, संसाधन आणि वातावरण उपलब्ध करून देणे हि सक्षमीकरणाची पहिली पायरी आहे.

अर्थिक,शैक्षणिक, राजकीय व कायदेशीर सबलीकरणासाठी रोजगाराच्या संधी समान वेतन मोफत शिक्षण ५०% राजकीय आरक्षण, शिष्यवृत्ती व हुंडाबंदी कायदा या गोष्टींचा प्रामुख्याने समावेश करावाच लागेल. याच गोष्टी स्वयं निर्णय क्षमता, मानसिक सक्षमीकरण व नेतृत्व गुण वाढीसाठी प्रेरणादायी आहे. समाजात व जनमाणसात महिलांचा सन्मान व दर्जा उंचावेल असे उपक्रम राबवणे गरजेचे आहे असेही त्या म्हणाल्या.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. एम.व्ही.कानेटकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.वृंदा कुलकर्णी, सूत्रसंचालन करून प्रगती घोडके यांनी आभार मानले. यावेळी यो.शि. संस्थेचे पदाधिकारी, संचालक,इतर मान्यवर, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील अतुल मुगळीकर यांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड 2026'

### 27 सप्टेंबर रोजी वितरण सोहळा



**अंबाजोगाई :** येथील श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे विद्यार्थीप्रिय अध्यापक तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्था इंग्रजी विषय प्रमुख श्री. अतुल मुगळीकर यांना रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाईच्यावतीने दिला जाणारा मानाचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड 2026' नुकताच जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता नागापूरकर सभागृह,योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे महाराष्ट्रातील ज्येष्ठ व ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांच्या शुभहस्ते होणार आहे. मुगळीकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेले कार्य, तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती दूर करून त्यांना इंग्रजी विषयाची गोडी लावण्यासाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन रोटरी क्लबने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र अलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे, श्री खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. अतुल देशपांडे, कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगावकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक संदीप देशमुख, पर्यवेक्षक सूर्यकांत उजगरे, पर्यवेक्षिका प्रेमल खंडागळे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे, ज्योती शिंदे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

## आर्थिक साक्षरतेसाठी आकाशवाणीवर अॅड. रविंद्र कानडे यांची विशेष मुलाखत

**बीड :** आर्थिक साक्षरतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रातर्फे 'आर्थिक साक्षरता' या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माजलगाव जिल्हा बीड येथील श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.चे व्यवस्थापकीय संचालक अॅड. रविंद्र कानडे यांची या विषयावर विशेष मुलाखत घेण्यात आली आहे.

अॅड रवींद्र कानडे फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट चे संचालक असून आर्थिक व्यवस्थापन या विषयाचे तज्ञ आहेत व व्यवस्थापनाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे. या मुलाखतीत बचत, गुंतवणूक, आर्थिक नियोजन, कर्जाचा जबाबदारीने वापर आणि आर्थिक स्वावलंबन याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विशेषतः सर्वसामान्य नागरिक, महिला, तरुण, शेतकरी व छोटे व्यावसायिक यांनी आर्थिक निर्णय घेताना योग्य माहिती घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. हा विशेष कार्यक्रम दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.१० वाजता आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर, FM 101.7 MHz वर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन राज दळेकर, तर सादरीकरण सुजित बनसोडे यांनी केले.

'आर्थिक साक्षर नागरिक – सक्षम कुटुंब – समृद्ध समाज' हा संदेश या कार्यक्रमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

# रेल्वे आली; आता बीडच्या रेल्वे स्थानकापर्यंत बस कधी ?

### 25 सप्टेंबरला बीड बसस्थानकासमोर स्वाक्षरी मोहीम; बीडकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे अशोक लोढा यांचे आवाहन

**बीड | प्रतिनिधी :** बीडकरांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर बीड-पुणे दैनंदिन रेल्वे सेवा सुरू झाली असून, या रेल्वेमुळे विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, व्यावसायिक, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसह पुणे आणि इतर शहरांकडे प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र रेल्वे सेवा सुरू झाल्यानंतर आता बीड शहरातून रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी नियमित आणि परवडणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध होणे गरजेचे आहे.

बीड शहरापासून रेल्वे स्थानक सुमारे 4 किलोमीटर अंतरावर असल्याने रेल्वे प्रवाशांना स्थानकापर्यंत जाण्यासाठी रिक्षा, खासगी वाहने किंवा इतर पर्यायांचा आधार घ्यावा लागत आहे. विशेषतः विदयार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, ग्रामीण भागातून येणारे प्रवासी तसेच कुटुंबासह प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही गैरसोय अधिक जाणवू शकते. रेल्वे पकडण्यासाठी वेळेवर स्थानकावर पोहोचणे आवश्यक असताना सार्वजनिक बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अतिरिक्त खर्च आणि गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. याच पार्श्वभूमीवर बीड बसस्थानक ते रेल्वे स्थानक नियमित बससेवा सुरू करावी, या मागणीसाठी शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ रोजी बीड बसस्थानकासमोर स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. भाजपा बीड शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या पुढाकारातून ही मोहीम आयोजित करण्यात आली आहे. रेल्वे ही बीडच्या विकासासाठी महत्त्वाची सुविधा असून, तिचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना सहज मिळण्यासाठी रेल्वे स्थानक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी जोडणे आवश्यक आहे.

बससेवा सुरू झाल्यास नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल, प्रवासाचा खर्च वाचण्यास मदत होईल आणि महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रवास अधिक सुलभ होऊ शकतो. तसेच रेल्वेने बीडमध्ये येणाऱ्या प्रवाशांनाही स्थानकावरून शहरात येण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होईल. रेल्वेच्या आगमन व प्रस्थानाच्या वेळांशी समन्वय साधून बसफेऱ्यांचे नियोजन केल्यास या सुविधेचा अधिक प्रभावीपणे उपयोग होऊ शकतो.

ही मागणी केवळ कोणत्याही एका राजकीय पक्षाची किंवा व्यक्तीची न राहता संपूर्ण बीड शहरातील नागरिकांची सामूहिक मागणी व्हावी, यासाठी विद्यार्थी संघटना, युवक मंडळे, व्यापारी संघटना, सामाजिक संस्था, महिला संघटना, ज्येष्ठ नागरिक, प्रवासी, डॉक्टर, वकील, पत्रकार तसेच शहरातील सर्वपक्षीय नेते व लोकप्रतिनिधींनी या स्वाक्षरी मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी अशोक लोढा यांनी सांगितले की, "बीडकरांनी अनेक वर्षे रेल्वेची प्रतीक्षा केली आणि आता बीड-पुणे दैनंदिन रेल्वे सेवा सुरू झाली आहे, ही आनंदाची बाब आहे. मात्र रेल्वेचा खरा आणि व्यापक लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळवून द्यायचा असेल तर शहरातून रेल्वे स्थानकापर्यंत नियमित सार्वजनिक बससेवा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, व्यापारी आणि सर्वसामान्य प्रवाशांना रिक्षा किंवा खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी सुरक्षित, नियमित आणि परवडणारी बससेवा सुरु होणे गरजेचे आहे." ते पुढे म्हणाले, "२५ सप्टेंबर रोजी बीड बसस्थानकासमोर होणाऱ्या स्वाक्षरी मोहिमेत प्रत्येक बीडकराने सहभागी होऊन आपल्या स्वाक्षरीतून या मागणीला बळ द्यावे. ही एका व्यक्तीची किंवा एका पक्षाची मागणी नसून बीडच्या सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेशी संबंधित मागणी आहे. नागरिकांचा सहभाग आणि एकजूट या मागणीला निश्चितच अधिक बळ देईल."

रेल्वे सेवा सुरू झाल्यानंतर निर्माण झालेली सार्वजनिक वाहतुकीची गरज लक्षात घेऊन संबंधित प्रशासन व परिवहन विभागाने या मागणीची गांभीर्याने दखल घ्यावी आणि बीड बसस्थानक ते रेल्वे स्थानक नियमित बससेवा सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. रेल्वे आली आहे; आता शहराला रेल्वे स्थानकाशी जोडणारी नियमित बससेवाही सुरू झाली पाहिजे. "एक स्वाक्षरी... बीडच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी एक ठोस आवाज!" २५ सप्टेंबरला बीड बसस्थानकासमोर होणाऱ्या स्वाक्षरी मोहिमेत प्रत्येक बीडकराने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अशोक लोढा यांनी केले आहे

# संयमानेच जीवनाची सार्थकता; सुगंध दशमीला राजाबाजार जैन मंदिरात गर्दी



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राजाबाजार येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात आचार्य विनम्रसागरजी महाराज यांच्या चातुर्मासानिमित्त सुगंध दशमी व उत्तम संयम धर्माचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थित राहून भगवंताचे दर्शन घेतले.

सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. सौधर्म इंद्र-इंद्राणी होण्याचा मान विजयाबाई, निलेश व नितीन सेठी परिवाराला मिळाला. सुगंध दशमीनिमित्त शांतिधारा, भगवंताला धूप अर्पण तसेच फुलांची चादर अर्पण करण्यात आली. धूप अर्पणाचा मान दिलीप, हेमंत, विपीन, करण, कुणाल व कपील बाकलीवाल तसेच आदित्य, अतिन व क्रियांश बाकलीवाल परिवाराला, तर फुलमाळा अर्पणाचा मान मधुबाला व भरत गंगवाल यांना मिळाला.

यावेळी आचार्य विनम्रसागरजी महाराज यांनी संयम धर्माचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले, "गरजा मर्यादित ठेवणे आणि कुठे थांबायचे हे कळणे म्हणजे संयम होय. संयम, सदाचार व चारित्र्याशिवाय मनुष्यजीवन अपूर्ण आहे." इंद्रिय, मन आणि वासनांवर संयमाचा अंकुश आवश्यक असून, संयमाचे पालन केल्यास जीवन सार्थक आणि समाधानी होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी यांच्यासह महावीर ठोले, चंदा कासलीवाल, यतीन ठोले, जितेंद्र पाटनी, संतोष सेठी, प्रमोद पाडे, शैलेश चांदिवाल आदी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्याची 26 वी वार्षिक सभा उत्साहात

## सभासदांना 6 टक्के लाभांश देण्यास बहुमताने मंजुरी; यंदा 3.50 ते 4 लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजी राजे साखर उद्योग लि., दीनदयाळनगर, चित्तेपिंपळगाव येथील कारखान्याची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. २२) कारखाना कार्यस्थळावर उत्साहात पार पडली. अहवाल काळातील नफ्याचा विचार करून सभासदांना ६ टक्के लाभांश देण्यास सभासदांनी बहुमताने मंजुरी दिली. यंदा कमी पावसामुळे ऊस उत्पादनात घट होण्याची शक्यता असली, तरी कारखान्याने ३.५० ते ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे.



कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी कारखान्याच्या वाटचालीचा आढावा घेत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कारखान्याचे देणे द्यावेच लागते; मात्र येणे कधी मिळेल याचा भरोसा नसतो. या दोन्ही बाबींमधील फरक लक्षात घेऊन आर्थिक शिस्त राखली तरच कारखाना यशस्वीपणे चालविता येतो.

हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्याने ३ लाख ३० हजार ८०४ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून ३ लाख ३५ हजार ९८० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. सरासरी साखर उतारा १०.१५६ टक्के राहिला. एफआरपी २,४७६.९० रुपये असताना कारखान्याने ऊस उत्पादकांना प्रतिटन २,९०० रुपये दर दिला असून, वाढीव १०० रुपये प्रतिटन अंतिम हप्ता लवकरच देण्यात येणार असल्याचे सभेत सांगण्यात आले.

शेतकऱ्यांना ऊसाचा अधिक दर मिळावा यासाठी कारखान्याने ३० केएलपीडी डिस्टिलरी प्रकल्पाचे काम २३ ऑक्टोबर २०२३ रोजी पूर्ण करून इथेनॉल निर्मिती सुरु केली. आतापर्यंत १ कोटी ४६ लाख ६६ हजार ४१६ लिटर इथेनॉलचे उत्पादन झाले असून, त्यापैकी १ कोटी २७ लाख ३७ हजार ५०० लिटर इथेनॉलची विक्री इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांना करण्यात आली. त्यातून कारखान्याला ६६ कोटी ६६ लाख २८ हजार ७०० रुपयांचे उत्पन्न मिळाले.

डिस्टिलरीतील स्पेन्ट वॉशवर प्रक्रिया करून हंगामात ८ लाख ८९ हजार ३२२ एनएम३ बायोगॅसची निर्मिती करण्यात आली. त्याचा बॉयलरसाठी इंधन म्हणून वापर करण्यात आला. यंदा या बायोगॅसपासून सीबीजी निर्मिती करण्याचे नियोजन आहे. तसेच स्प्रे ड्रायरच्या माध्यमातून ६०.१०० मेट्रिक टन पोटॅश पावडर तयार करून ऊस उत्पादकांना अल्प दरात विक्री करण्यात आली.

को-जनरेशन प्रकल्पातून ५० लाख २८ हजार ५२५ युनिट वीज निर्मिती करून ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला विक्री करण्यात आली. कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक विवेक देशपांडे यांनी नानांनी २००१ मध्ये कारखाना उभारून काटकसरीने २५ वर्षे यशस्वीपणे चालविल्याचे नमूद केले.

विस्मा संस्थेचे अध्यक्ष तथा नॅचरल शुगरचे चेअरमन बी. बी. ठोंबरे यांनी कमी गाळप क्षमतेच्या कारखान्यात को-जनरेशन, डिस्टिलरी, इथेनॉल, ड्रायर, पोटॅश आणि सीबीजीसारखे प्रकल्प उभारून सभासदांना लाभांश तसेच मोफत साखर देणारा कारखाना उभारल्याचे सांगितले. कारखाना संचालक प्रल्हाद पव्हाळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कारखान्याचे सरव्यवस्थापक दिगंबर बडदे यांनी प्रास्ताविक केले. मुख्य लेखाधिकारी शिवाजीराव टकले यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. उपाध्यक्ष दामोधर (आण्णा) नवपुते यांनी आभार मानले. यावेळी संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने सभासद व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# नोव्हा 2 पॉवर उच्च कार्यक्षमतेसह

**छत्रपती संभाजीनगर, :** एआय प्लस ने नोव्हा 2सिरीज मधील नवीनतम स्मार्टफोन नोव्हा 2 पॉवर 5जी लॉंच केला आहे. अत्याधुनिक डिझाइन, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी पॉवर यांचा संगम असलेला हा स्मार्टफोन तंत्रज्ञानप्रेमी नव्या पिढीच्या गरजा लक्षात घेऊन सादर करण्यात आला आहे. पारंपरिक स्मार्टफोन लॉन्चच्या पद्धतीपेक्षा वेगळ्या आणि अनोख्या पद्धतीने, नोव्हा 2 पॉवर ने नवी दिल्लीतील रॅम्पवर पदार्पण करत फॅशन आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम सादर केला. आधुनिक रॅम्प लुक्समध्ये हा स्मार्टफोन समाविष्ट करण्यात आला होता, ज्यातून तो केवळ तंत्रज्ञानाचे उपकरण नसून स्टायलिश ॲक्सेसरी म्हणूनही आपली ओळख अधोरेखित करतो.

# उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेकडून 'मूषक आला रे' उपक्रम

**पुणे:** यंदाच्या गणेशोत्सवात उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक 'मूषक आला रे' उपक्रमाच्या माध्यमातून बाप्पाला भाविकांच्या अधिक जवळ घेऊन येत आहे. गणपती बाप्पाचा लाडका मूषक भाविकांच्या मनातील इच्छा बाप्पापर्यंत पोहोचवतो, या श्रद्धेवर आधारित हा उपक्रम आखण्यात आला आहे.हा उपक्रम गणेशोत्सवाचा आनंद अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक बनवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक अडचणींमुळे गर्दीच्या मंडपांना भेट देणे कठीण जाणाऱ्या व्यक्तींसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

# एलजी इंडियाने सादर केली सेमी-ऑटोमॅटिक वॉशिंग मशीन्सची नवी रेंज,

**छत्रपती संभाजीनगर :** एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने आज त्यांच्या सेमी-ऑटोमॅटिक वॉशिंग मशीन्सच्या नवीन रेंजच्या लॉंचची घोषणा केली. ही नवी रेंज दमदार वॉशिंग कार्यक्षमता, स्मार्ट सुविधा, मजबूत बांधणी आणि आकर्षक प्रीमियम डिझाईन देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. 8 किग्रॅ ते 12 किग्रॅ क्षमतेच्या 15 मॉडेल्समध्ये उपलब्ध असलेली ही नवीन लाईनअप भारतीय ग्राहकांना कुटुंबाचा आकार, कपडे धुण्याच्या गरजा आणि डिझाईनच्या आवडीनुसार उत्तम पर्याय देते. 10 हून अधिक देशांना लक्षित करत, एएक्स सेमी-ऑटोमॅटिक वॉशिंग मशीन्सची निर्यात 2027 मध्ये सुरू होणार आहे.

# माय युपीआय सादर केले

**नाशिक:** नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ची पूर्ण मालकीची उपकंपनी एनपीसीआय भीम सर्व्हिसेस लिमिटेड (एनबीएसएल) ने आज भीम पेमेंट्स ॲप वर संवादात्मक एआई-आधारित सहाय्यक मायुपीआय सादर केल्याची घोषणा केली. मायुपीआय हे भीम वापरकर्त्यांसाठी त्यांच्या युपीआय -संबंधित गरजांसाठी २४/७ बहुभाषिक आणि सोपे सहाय्य उपलब्ध करून देते. यामुळे पेमेंट अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि व्यवस्थापित करणे सुलभ होण्यास मदत होते. वापरकर्ते एकाच ठिकाणी व्यवहारांचा इतिहास पाहू शकतात, तक्रारी नोंदवून त्यांचा मागोवा घेऊ शकतात, कोणत्याही युपीआय ॲपद्वारे सेट केलेले मँडेट पाहू व व्यवस्थापित करू शकतात.

# एलआयसीएचएफएल फायनान्शियल सर्व्हिसेससोबत भागीदारी

**मुंबई,:** भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या निवा बुपा हेल्थ इन्शुरन्सने एलआयसीएचएफएल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड सोबत कॉर्पोरेट एजन्सी करार केला असून धोरणात्मक भागीदारी केली आहे. सर्वसमावेशक आरोग्य विमा सेवांची उपलब्धता वाढवणे आणि अधिकाधिक व्यक्ती व कुटुंबांना आरोग्यविषयक गरजांसाठी आर्थिकदृष्ट्या सज्ज होण्यास सक्षम करणे, हा या भागीदारीचा उद्देश आहे. ही भागीदारी निवा बुपाचे आरोग्य विमा क्षेत्रातील कौशल्य आणि ग्राहककेंद्रित सेवा यांना एलआयसीएचएफएल एफएसच्या व्यापक नेटवर्क आणि वित्तीय सेवा परिसंस्थेशी जोडते. यामुळे ग्राहकांना त्यांच्या एकूण आर्थिक नियोजनाचा भाग म्हणून योग्य आरोग्य संरक्षण सेवा मिळवण्याच्या अधिक संधी निर्माण होणार आहेत.

# विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार

**मुंबई, 23 सप्टेंबर 2026:** भारतातील आघाडीच्या स्पेशालिटी फिल्म्स उत्पादकांपैकी एक असलेल्या गरवारे हाय-टेक फिल्म्स लिमिटेड आणि स्पेशालिटी केमिकल्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी लुब्रिझोल यांनी आज लुब्रिझोलच्या जागतिक दर्जाच्या थर्मोप्लास्टिक पॉलीयुरेथेन तंत्रज्ञानाच्या भारतात विकास आणि उत्पादनासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केल्याची घोषणा केली.या भागीदारीमुळे गरवारे हाय-टेक फिल्म्स लिमिटेड च्या नव्या स्पेशालिटी ॲप्लिकेशन्ससाठी तंत्रज्ञानावर आधारित टीपीयू उत्पादन प्लॅटफॉर्म उभारण्याच्या धोरणाला महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे. तसेच, कंपनीच्या प्रीमियम पेंट प्रोटेक्शन फिल्म व्यवसायासाठी टीपीयू फिल्म्सच्या उत्पादन प्रक्रियेत उत्पादनासाठी लागणारा महत्त्वाचा कच्चा माल स्वतः तयार करण्याची क्षमता साध्य करण्यासही यामुळे मदत होणार आहे.

# फायनान्सची रक्कम हडपण्यासाठी लुटीचा बनाव करणाऱ्या तिघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२३ :** शिंदेवाडी फाट्याजवळ फायनान्स कंपनीच्या ६८ हजार ५६ रुपयांच्या रकमेचा अपहार करण्यासाठी स्वतःच्या लुटीचा बनाव केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

फायनान्स कंपनीच्या फिल्ड असिस्टंट किरण पंढरीनाथ वैरागर याने दोन साथीदारांच्या मदतीने हा कट रचल्याचे पोलिस चौकशीत समोर आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी किरण वैरागर, रवि ज्ञानदेव दरंदले आणि आकाश साहेबराव हटकर यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.भारत फायनान्शियल इनक्लूजन लिमिटेडच्या गंगापूर शाखेत फिल्ड असिस्टंट म्हणून काम करणारा किरण वैरागर हा २१ सप्टेंबर रोजी लासूर परिसरात फायनान्सच्या हप्त्यांची वसुली करण्यासाठी गेला होता. दिवसभरात त्याने ग्राहकांकडून ६८ हजार ५६ रुपये रोख जमा केले होते.सायंकाळी शाखा व्यवस्थापक योगेश



गिते यांनी किरणशी फोनवर संपर्क साधला. त्यावेळी तो आयडियल स्कूलजवळ असून काही मिनिटांत कार्यालयात येत असल्याचे त्याने सांगितले. मात्र बराच वेळ उलटूनही तो शाखेत न आल्याने पुन्हा फोन केला असता मोबाईल बंद मिळाला. त्यामुळे शाखा व्यवस्थापकासह त्याचा मेव्हणा व मित्राने त्याचा शोध सुरू केला.रात्री सुमारे दहा वाजता एका नागरिकाचा फोन आला. लासूर-गंगापूर रोडलगत किरण हात-पाय बांधलेल्या अवस्थेत पडला असून त्याच्या अंगावर जखमा आहेत, अशी माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत किरणला ताब्यात घेतले.सुरुवाती

फायनान्सची रक्कम हडप करण्यासाठी लुटीचा बनाव

ला किरणने चार अनोळखी व्यक्तींनी दोन मोटारसायकलींवरून येऊन आपल्याला अडविले, शेतात नेले आणि चाकूने जखमी करून बॅगेतील ६८ हजार ५६ रुपये व मोबाईल लुटून नेल्याची कहानी सांगितली. मात्र त्याच्या कथनावर शाखा व्यवस्थापकाला संशय आला. त्यानंतर पोलिसांनी सखोल चौकशी केली असता या कथित लुटीमागील वेगळेच चित्र समोर आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

पोलिसांच्या चौकशीत किरणने दिलेल्या माहितीनुसार, त्याचा मित्र रवि दरंदले याला पैशांची गरज होती. त्यामुळे फायनान्सची वसूल केलेली रक्कम हडप करून अज्ञात चोरट्यांनी लुटल्याचा बनाव करण्याचा कट रचण्यात आला.कटानुसार रवि दरंदले व आकाश हटकर हे प्लॅटिना मोटारसायकलवरून किरणला शिल्लेगावजवळ भेटले. त्यानंतर तिघे शिंदेवाडी फाट्याजवळील आयडियल इंग्लिश स्कूल परिसरात आले. तेथे किरणची मोटारसायकल रस्त्याच्या बाजूला उभी करण्यात आली. त्यानंतर तिघेही दुसऱ्या मोटारसायकलवरून गंगापूर रोडने पुढे गेले आणि रस्त्यालगतच्या शेतात गेले. तेथे किरणचे हात-पाय दोरीने बांधण्यात आले. तोंडाला रुमाल बांधण्यात आला. रविने चाकूने किरणचा शर्ट फाडला आणि त्याच्या बॅगेतील ६८ हजार ५६ रुपये व मोबाईल घेऊन रवि व आकाश तेथून निघून गेले, अशी कबुली त्याने पोलिसांना दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर किरण शेतातून सरकत रस्त्याच्या कडेला आला आणि तेथून जाणाऱ्या नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. त्यामुळे पोलिस घटनास्थळी पोहोचले. मात्र शाखा व्यवस्थापकाने सुरुवातीपासूनच किरणच्या कथनाबाबत संशय व्यक्त केल्याने पोलिस तपासाला वेगळे वळण मिळाले.

# धर्म प्रचारक आचार्य सुयश शिवपुरी यांचा गौरव

**पैठण दि २३ :-** वैदीक संस्कृती धर्म प्रचार तथा वैदीक कर्मामध्ये अध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल छत्तीसगड मध्यप्रदेश उत्तरप्रदेश उत्तराखंड कर्नाटक केरळ महाराष्ट्र प्रांतातील दुर्गम भागातील लोकांना अध्यात्मिक एकाग्रता तथा सामाजिक हिंदू संस्कृती धर्म प्रचार




कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कोल्हापूर येथील आनंदी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने यावर्षी राष्ट्रीय गौरव पुरस्कार देऊन श्रीक्षेत्र पैठणचे आचार्य सुयश कमलाकर गुरू शिवपुरी गुरुजी यांना दिव्य समारंभात गौरविण्यात आले. या सन्मानाकरता पैठण येथील सन्माननीय नगराध्यक्षा विद्याताई भुषण कावसनकर सतिश आखेगावकर ब्राह्मण सभा पंचकमेटीचे महेश दादा जोशी प्रकाश वानोळे, रेखाताई कुलकर्णी श्री दत्तागुरु पोहेकर प्रमोद आपेगावकर राजेश जोशी दत्तागुरु सेवनकर देविदास अन्ना आखेगावकर दिनेशजी पारीख ब्राह्मण सभा पैठण श्री दत्त भक्त मंडळ पैठण आदी सर्वांनी शिवपुरी अभिनंदन केले

# 'धप्पा'ची टीम छत्रपती संभाजीनगरात; मराठवाड्यातील प्रेक्षकांशी साधला संवाद



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण मातीतील निरागस प्रेमकहाणी मांडणारा आगामी मराठी चित्रपट 'धप्पा' सध्या चर्चेत आहे. ९ ऑक्टोबरला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी दिग्दर्शक रविराज लिंबादास वाव्होळे यांच्यासह अभिनेता सागर भंडारे आणि अभिनेत्री प्रतिक्षा अत्राम यांची टीम छत्रपती संभाजीनगरात दाखल झाली. यावेळी कलाकारांनी स्थानिक प्रसारमाध्यमांशी संवाद साधत तरुणाईशीही दिलखुलास गप्पा मारल्या.

'वृंदावन एंटरटेनमेंट अँड फिल्म्स' प्रस्तुत या चित्रपटातून सागर भंडारे आणि प्रतिक्षा अत्राम ही नवी जोडी रुपेरी पडद्यावर पदार्पण करत आहे. 'ये दूरिया' या कव्वाली गीताचीही सध्या विशेष चर्चा असून, त्याचे संगीत, संगीत संयोजन व शब्दरचना दिग्दर्शक रविराज वाव्होळे यांनी केली आहे. गायक राजू नदाफ यांच्या आवाजातील या गीताचे मिक्सिंग व मास्टरिंग यशराज स्टुडिओमध्ये विजय दयाल यांनी केले आहे.

"'धप्पा' ही ग्रामीण भागातील प्रेम, मैत्री आणि संघर्षाची हृदयस्पर्शी कथा आहे. ती प्रेक्षकांना आपलीशी वाटेल," असे दिग्दर्शक वाव्होळे यांनी सांगितले. सपना पोपट ढेरंगे, माधुरी राहुल दिवसे आणि सागर गीता चांगदेव भंडारे निर्माते असून, ९ ऑक्टोबरपासून चित्रपट महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.

# तालीम–तहज़ीब–तरक्कीमुळेच समाज व राष्ट्राची प्रगती : डॉ. इंद्रेश कुमार

## मुस्लिम महिला संमेलनात शिक्षण, संस्कार, आत्मनिर्भरता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण, संस्कार आणि प्रगतीच्या माध्यमातून समाजात बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता अधिक मजबूत होऊ शकते. त्यासाठी महिलांनी शिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्यासोबतच कुटुंब आणि समाजाच्या विकासात सक्रिय भूमिका बजवावी, असे आवाहन मुस्लिम राष्ट्रीय मंचचे संरक्षक डॉ. इंद्रेश कुमार यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समीना अजमेरी पठाण बारगिर यांनी केले, तर आभार महेजबीन नवाज पठाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेहताब पठाण, डॉ. नवाज पठाण, डॉ. निज़ाम पठाण, डॉ. अज़हर बारगीर, डॉ. निशा गोविंदानी, योगेश बडक, सय्यद अकबर अली यांच्यासह सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने संमेलनाचा समारोप झाला.

मुस्लिम राष्ट्रीय मंचच्या वतीने एमजीएम संकुलातील आर्यभट्ट सभागृहात 'तालीम–तहज़ीब–तरक्की - आज की मुस्लिम महिला' या विषयावर एकदिवसीय विभागीय मुस्लिम महिला संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनास मुस्लिम महिला मोठ्या संख्येने कुटुंबीयांसह उपस्थित होत्या. महिला शिक्षण, संस्कार, आत्मनिर्भरता आणि राष्ट्रनिर्माणातील महिलांची भूमिका यावर यावेळी विचारमंथन झाले.

डॉ. इंद्रेश कुमार यांनी 'आपण सर्व एक आहोत' असा संदेश देत परस्परांतील वैर व भेदभाव दूर करून शिक्षण, संस्कार आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले. तालीम, तहज़ीब आणि तरक्कीमुळे समाजातील बंधुभाव वाढून राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अंकुशराव कदम यांनी सर्व धर्मांचा मूलभूत सार मानवता, प्रेम आणि सद्भावना असल्याचे सांगितले. समभाव, परस्पर सन्मान आणि प्रेम या मूल्यांमुळे समाज अधिक घट्ट जोडला जातो, असे त्यांनी नमूद केले.

मेजर फिरासत यांनी महिला शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. 'तालीम हीच महिलेच्या प्रगतीची दिशा ठरवणारी शक्ती आहे,' असे सांगत शिक्षणाच्या माध्यमातून महिला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वासोबतच कुटुंब आणि समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुस्लिम राष्ट्रीय मंचच्या महिला प्रकोष्ठाच्या राष्ट्रीय संयोजिका तथा कार्यक्रमाच्या आयोजक डॉ. तस्नीम पटेल यांनी ज्ञानाच्या माध्यमातूनच अज्ञानाचा अंत होऊ शकतो, असे सांगितले. महिलांनी ज्ञान आणि शिक्षणाला आपल्या जीवनातील महत्त्वाचे 'दागिने' बनवावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांच्या प्रगतीसाठी कुटुंबाचा सहकार्याचा आधारही महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या डॉ. अस्मा खान, मोहतरमा बदर, मोहतरमा फराह अहमद सैयद, श्रीमती अर्शिया अकबर अली आणि मिस लिमरा यांचा सन्मान करण्यात आला.

# संत महानतांच्या आश्रमातील कार्यासाठी शिवसेना धर्म साहाय्यता कक्षाच्या माध्यमातून मदतीचा हात

खुलताबाद प्रतिनिधी .छत्रपती संभाजी नगर पैठण रोड येथील मानभाव आश्रम श्रीकृष्ण मंदिर मुनिश्री सुदर्शन महाराज कपाटे शिव सेना ( शिंदे गट) धर्म सहाय्यता कक्ष च्या वतीने चालू असलेल्या मराठवाडा भरातील सर्व हिंदू धर्मीय साधुसंत महंत यांच्या विविध आश्रमामध्ये चालू असलेले कामासंबंधी येणाऱ्या अडीअडचणीच्या बाबतीत चर्चा मार्गदर्शन होत असून यासाठी अनेक संत महंत त्यांच्या भेटीगाठी



घेऊन मोठ्या प्रमाणात मदत कार्य करत आहे. साध्वी महंत भवतदास त्यागी ( विजया देवी) श्री पंचमुखी हनुमान खंबाळे. तालुका त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक या ठिकाणी होणार असलेल्या कुंभमेळ्यासंदर्भातील काही संत महानतांच्या अडचणी बाबतीत महंत कपाटे यांच्याशी चर्चा करून समाधान व्यक्त केले व लवकरच त्र्यंबकेश्वर येथे येण्यासाठी निमंत्रित केले यावेळी ह भ प नारायण बांबर्डे सतोष करपे पाटील. अँड प्रमोद मिठा इंदुरकर यांची उपस्थिती होती

# एनजे वेल्थ च्या मदतीने कौटुंबिक वारशाचे ₹386 कोटींच्या व्यवसायात रूपांतर

छत्रपती संभाजीनगर- सीए म्हणून प्रॅक्टिस करण्याचा मार्ग रिषिकेश कुंकुलोल यांच्यासाठी स्वाभाविक करिअर पर्याय वाटत होता. मात्र, 2016 मध्ये झालेल्या एका महत्त्वपूर्ण संवादाने त्यांच्या व्यावसायिक प्रवासाला नवी दिशा दिली. त्यांच्या कौटुंबिक व्यवसायाच्या दुसऱ्या पिढीतील सदस्य म्हणून रिषिकेश यांना 2006 पासूनच त्यांच्या कुटुंबाच्या एनजे वेल्थ सोबतच्या संबंधामुळे या व्यवसायाची ओळख होती. मात्र, नंतर त्यांनी या व्यवसायाशी अधिक घट्ट नाते जोडले आणि त्यातील दीर्घकालीन क्षमता समजून घेतली. आज त्यांच्या कुटुंबाचा एनजे वेल्थ सोबतचा प्रवास दोन दशके पूर्ण करत आहे आणि हा वारसा पुढे नेण्यात रिषिकेश यांची महत्त्वाची भूमिका आहे.

रिषिकेश यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा नोव्हेंबर 2016 मध्ये आला. सीए च्या तीन अयशस्वी प्रयत्नांनंतर ते कुटुंबासोबत एनजे वेल्थ च्या मुख्य कार्यालयात गेले. तेथे नीरज सर यांच्यासोबत झालेल्या संवादातून त्यांना या व्यवसायाची क्षमता आणि चक्रवाढीची ताकद समजली. त्यांनी सीए प्रॅक्टिसवर टीका करण्याऐवजी दोन्ही मार्गांची वैशिष्ट्ये आणि कौटुंबिक व्यवसायाची दीर्घकालीन क्षमता समजावून सांगितली. त्यानंतर रिषिकेश यांनी व्यवसायावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांच्या वडिलांनी त्यांना आधी सीए पूर्ण करण्याचा आग्रह धरला. अखेर त्यांनी 2019 मध्ये, लग्नाच्या काही दिवस आधी, सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या



पत्नीही सीए असून त्या आता या व्यवसायाचा भाग आहेत.

सध्या हा व्यवसाय सुमारे ₹386-387 कोटींचे एयूएम व्यवस्थापित करतो, 2,400 हून अधिक ग्राहकांना सेवा देतो आणि त्याची मासिक SIP बुक अंदाजे ₹3.10 कोटी आहे. ग्राहकवर्ग संपूर्ण भारतभर विस्तारलेला असून, सुमारे 95% ग्राहक भारतात आहेत, तसेच काही NRI ग्राहकही आहेत.

त्यांच्या व्यवसायाच्या विस्तारात तंत्रज्ञानाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. NGS e-Wealthच्या माध्यमातून प्रत्यक्ष कागदपत्रांशिवाय ग्राहकांचे ऑनबोर्डिंग जलदपणे पूर्ण करता येते, ज्यामुळे संपूर्ण भारतातील ग्राहकांना सेवा देणे शक्य झाले आहे. पोर्टफोलिओ रिव्ह्यू टूल्स, कुटुंबाच्या उद्दिष्टांचे मॅपिंग आणि एनजीएस रेकमंडेड पोर्टफोलिओस यामुळे ग्राहकसेवा आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आहे. वरिष्ठ सपोर्ट टीमशी थेट संपर्कामुळे ग्राहकांच्या गरजा लवकर पूर्ण करता येतात. रिषिकेश यांच्या मते, महानगरांपासून छोट्या शहरांपर्यंत गुंतवणूकदार बाजारातील चक्रांवर अनेकदा समान प्रतिक्रिया देतात, त्यामुळे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. तसेच,जेन ज़ेड मध्ये खर्च, त्वरित समाधान आणि सहज उपलब्ध होणाऱ्या कर्जाकडे वाढता कल दिसत असल्याने शिस्तबद्ध आर्थिक नियोजनाची गरज अधिक महत्त्वाची ठरते.

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०३/२०२६

१/- बिलाम झब्बू जाधव वय.४३ वर्ष धंदा शेती,रा. बोरमाळ ताडा ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

विरूद्ध- निल

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधिताम जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अँड. सचिन सु. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत झब्बू मोहन जाधव याचा दि. २१.०९.२०२५ रोजी मौजे रा. जंगलीकोठा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन वरील अर्जदार क. १ हे वारस आहेत, असा अर्ज मा न्यायालयात दाखल केलेला आहे अर्जदार क १ हे मयत झब्बू मोहन जाधव यांचे वारस असून त्याना शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. २३.०९.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे

पु.ता.४/११/२०२६

क. लिपीक सहाय्यक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९८/२०२६

१/- रामकृष्णा गोबा पाटील, वय ८० वर्ष, धंदा शेती, रा. घोमला, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. २/- अनिल रामकृष्णा पाटील, वय ४९ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध - निल

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गयाबाई रामकृष्णा पाटील यांचा दि. २९.०८.२०२६ रोजी मौजे रा. घोसला, ता.सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन वरील अर्जदार क. १ व २ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ व २ हे मयत गयाबाई रामकृष्णा पाटील यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दि. २३.०९.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता...२/११/२०२६

क. लिपीक सहाय्यक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## अग्रलेख

# ज्याच्या हाती कायद्याची लाठी...

एखाद्या व्यक्तीच्या दारावर अचानक पोलिस येतात. त्याला ताब्यात घेतात. घरच्यांना धक्का बसतो. शेजाऱ्यांच्या नजरा वळतात. फोन बंद होतात. संपर्क तुटतो. काही तासांत तो माणूस सर्वांसाठी 'आरोपी' होतो. त्याच्याविरुद्ध काय आरोप आहे, हे त्याला कळते किंवा कळत नाही; पण त्याचे स्वातंत्र्य मात्र संपलेले असते. या टप्प्यावर भारतीय राज्यघटनेने कलम २२ (१) अंतर्गत अप्रत्यक्षपणे पोलिसांना विचारलेल्या प्रश्नाचा पुनरुच्चार करून सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निर्णयात पोलिसांच्या अनियंत्रित वर्तणुकीला लगाम लावण्याचा प्रयत्न केला आहे. लेखी कारण न दिल्यास अटक बेकायदेशीर ठरते. अशा प्रकरणात पोलिस अधिकाऱ्यांची चौकशी केली पाहिजे, असा निर्वाळा दिला आहे. राज्यघटनेच्या कलम २२(१) मध्ये स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर सांगितली पाहिजेत आणि त्याला आपल्या पसंतीच्या वकिलाशी सल्लामसलत करण्याचा व त्याच्यामार्फत बचाव करण्याचा अधिकार नाकारता येणार नाही. तसे हे नवीन नाही. राज्यघटना नवी नाही आणि त्यातील उपरोक्त तरतूदही नवीन नाही. संविधान निर्मात्यांचे जिवंत अनुभव या कलमाच्या मागे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात घटना लागू झाली. पण, पोलिसांचे स्वरूप एका रात्रीत बदलणारे नव्हते. घटना समितीत झालेल्या चर्चेत या धोक्याची जाणीव असलेल्यांनी आपली मते मांडली आणि त्यामुळेच या कलमाला घटनेत स्थान मिळाले होते. ती चर्चा वाचताना आजही अस्वस्थ वाटते. कारण १९४९ मध्ये व्यक्त झालेली भीती आणि २०२६ सालातील स्थिती यांत फार मोठे अंतर पडलेले नाही. सरकार बदलले. पोलिसांचा गणवेश बदलला. कायदे बदलले. पण, मूलभूत धोका तसाच राहिला. ती असा की, अटक करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ती-यंत्रणेकडून अधिकाराचा गैरवापर होऊ शकतो. अनेकदा होतोही. त्यामुळेच पोलिसांच्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांना या कलमान्वये अधिकार दिलेला आहे, हेच सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकवार सांगितले आहे.

प्रत्येक अटक बनावट नसते किंवा प्रत्येक पोलिस अधिकारी दुष्ट हेतूने काम करतो, असे म्हणणे अन्यायकारक आहे. गंभीर गुन्ह्यांचा तपास करायचा असतो. आरोपी फरार होऊ शकतो. पुरावे नष्ट करू शकतो. साक्षीदारांवर दबाव आणू शकतो. आरोपी पुन्हा गुन्हा करू शकतो. काही वेळा तातडीची कारवाई अपरिहार्य असते आणि ती अटक असू शकते. पण, तपासाची गरज आणि घटनात्मक अधिकार यांच्यात निवड करण्याची मुभा पोलिसांना संविधानाने दिलेली नाही. कारण अटक करण्याची प्रक्रिया अत्यंत केंद्रिकृत असते. त्या प्रक्रियेत काही चूक झाली तर त्याच यंत्रणेला ती चूक झाकण्याचा मोह होऊ शकतो. अशा स्थितीत ज्याने चूक केली, त्याला सुटून जाता येऊ नये, हे या घटनात्मक तरतुदीचे मर्म होय. सर्वोच्च न्यायालयाने २१ सप्टेंबरच्या आदेशात जे म्हटले आहे, ते या अनुषंगाने समजून घेतले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा स्पष्ट केले आहे की, अटकेची कारणे लेखी स्वरूपात आणि आरोपीला समजणाऱ्या भाषेत दिली पाहिजेत. सामान्य परिस्थितीत ती अटकेच्या वेळीच दिली जाणे अपेक्षित आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत, अटकेच्या क्षणी लेखी कारण देणे व्यवहार्य नसल्यास प्रथम तोंडी कारण सांगता येईल; पण त्यानंतरही दंडाधिकाऱ्यासमोर रिमांडसाठी नेण्याच्या किमान दोन तास आधी लेखी कारणे देणे आवश्यक आहे. हा कालावधी पाळला न गेल्यास अटक बेकायदेशीर ठरू शकते. याचा सरळ अर्थ असा की, "साहेब, आम्ही त्याला तोंडी सांगितले होते," एवढे सांगून आता प्रकरण संपणार नाही. कारण, तोंडी सांगितल्याचे कोण सिद्ध करणार? म्हणून लेखी पुरावा आवश्यक ठरतो. यापूर्वी एका प्रकरणात वकिलाशी सल्लामसलत, पोलिस कोठडीला विरोध आणि जामीन मागणे यासाठी अटकेची कारणे समजणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. एखाद्याची अटक ही अपरिहार्य आहे, असा कायदा राबविणाऱ्या यंत्रणेचा दावा असला, तरी अटकेसाठी लेखी कारणे देऊन आरोपीला कायदेशीर मदत मागण्याचा मार्ग मोकळा करून दिलाच पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचा सर्वात महत्त्वाचा भाग फेरअटकेसंबंधीचा आहे. समजा एखाद्याला पोलिसांनी अटक केली आणि लेखी कारणे दिली नाहीत. ही अटक बेकायदेशीर असल्याचे दंडाधिकारी म्हणाले. ती व्यक्ती सुटली. आता पोलिस म्हणतात की, कागदोपत्री चूक झाली आहे. ठीक आहे. आता आम्ही त्याला पुन्हा अटक करतो. येथे सर्वोच्च न्यायालयाने ब्रेक लावला आहे. पहिली अटक बेकायदा ठरून व्यक्ती सुटली असेल तर त्याच यंत्रणेला पुन्हा स्वतःच्या मनानुसार त्या व्यक्तीला लगेच पुन्हा अटक करता येणार नाही. तपास यंत्रणेला प्रथम अटकेची लेखी कारणे द्यावी लागतील. पहिल्यांदा कारणे का दिली नाहीत, याचे स्पष्टीकरण द्यावे लागेल आणि पुन्हा कोठडी का आवश्यक आहे, हे सांगावे लागेल. याचा अर्थ असा की, ज्या अधिकाऱ्याने संविधानातील तरतुदीचा भंग केला, त्यालाच पुन्हा नागरिकाचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार दिला जाऊ नये. हा पोलिसांवरील अविश्वास नव्हे; हे अधिकारांवरील नियंत्रण होय. सारेच पोलिस ठाणे किंवा सारेच पोलिस कायदा पाळतात असेही नाही. लोकशाहीतील पोलिस यंत्रणा ही 'सरकारची लाठी' नसते. ती कायद्याची अंमलबजावणी करणारी सार्वजनिक यंत्रणा असते. तिला मिळालेले अधिकार नागरिकांकडून आले आहेत. ते त्यांना संविधानाने दिले आहेत आणि संविधान व कायद्यानेच ते मर्यादित केले आहेत. सामान्य नागरिकाकडे अधिकृत सत्ता नसते. पोलिसांकडे ती असते. ज्याच्या हातात अधिकार आहे, त्याच्याकडून अधिक शिस्त अपेक्षित असते. ज्याच्या एका सहीने माणूस कोठडीत जातो, त्याच्याकडून अधिक जबाबदारी अपेक्षित असते. ज्याच्या एका चुकीमुळे एखाद्याचे जीवन उद्ध्वस्त होऊ शकते, त्याने 'प्रक्रियात्मक चूक' हा शब्द ढालीसारखा वापरता कामा नये, हेच सर्वोच्च न्यायालयाने नव्याने सांगितले आहे. कलम २२ संविधानात सुरुवातीपासून आहे. जुन्या कायद्यात अटकेचे कारण सांगण्याची तरतूद होती. नव्या कायद्यातही ती आहे. घटनेतही आहे. कायद्यात न्यून नाही. कायद्याचे पालन करण्यासाठी लागणाऱ्या संस्थात्मक संस्कृतीत उणिवा आहेत. भारतात कायद्यांची कमतरता ही समस्या नसून अंमलबजावणीची समस्या मोठी आहे. या निर्णयाचा परिणाम साध्य करण्यासाठी काही गोष्टी झाल्या पाहिजेत. त्यातील पहिली म्हणजे अटकेचे लेखी कारण हे स्पष्ट आणि आरोपीला समजणाऱ्या भाषेत असले पाहिजे. फॉर्ममधील दोन ओळींचा रकाना भरून काम भागता कामा नये. दुसरा मुद्दा म्हणजे ही अटक कायदेशीर आहे की नाही, यावर रिमांडच्या वेळी विचार झालाच पाहिजे. तिसरा मुद्दा म्हणजे ज्या अधिकाऱ्याने चूक केली त्याच्यावर प्रत्यक्ष कारवाई झाली पाहिजे. एखाद्यावर कितीही गंभीर आरोप असला, तरी कारवाई ही कायद्याच्या चौकटीतच झाली पाहिजे, असा संविधानाचा आग्रह आहे. गुन्हा गंभीर असेल तर तपास अधिक सक्षम करा. दोष सिद्ध करा. पण 'गुन्हा गंभीर आहे म्हणून संवैधानिक व कायदेशीर प्रक्रिया आम्हाला लागू नाही' असे म्हणण्याचा अधिकार कोणत्याही तपास यंत्रणेला नाही, असेच सर्वोच्च न्यायालयाला म्हणायचे आहे. याचा अर्थ असा की, ज्याच्या हाती कायद्याची लाठी, त्याची जबाबदारी मोठी! खाकी वर्दीला अधिकारांचे भान आहेच. आता मर्यादांचे भान यावे, अशी अपेक्षा नागरिकांची या निर्णयाच्या अनुषंगाने केली तर ती गैरवाजवी ठरणार नाही. ■

## धर्म-संस्कृती

# कैलासराणा शिवचंद्रमौळी : अद्भुत शिवस्तुती...!

**प्रा. दिलीप जोशी**

शिवभक्तांमध्ये शिवलीलामृत, शिव महिम्न, शिवपंचाक्षरी जप, रुद्राभिषेक जितके प्रसिद्ध आहेत त्याहून अधिक आवडती आणि प्रसिद्ध आहे ती 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' ही शिवस्तुती. ही शिवस्तुती सर्वत्र भक्तिभावाने गायिली जाते. स्कंदपुराणातील तत्त्वावर आधारित 'कैलासराणा' ही शिवस्तुती 'कैलासराणा' याच नावाने प्रसिद्ध आहे. शिवस्तुतीच्या रचनाकारांबाबत विविध मते असली, तरी उपलब्ध हस्तलिखिते आणि इतर माहितीवरून प. पू. श्रीधरस्वामी नाझरेकर यांनी ही शिवस्तुती रचिली आहे. श्रीधरस्वामींचे कुलदैवत नागेश्वर असून त्यांच्या वडिलांचे नावदेखील नागेश आहे. शिवलीलामृत किंवा त्यातील अकरावा अध्याय वाचल्यावर शिवस्तुती म्हणण्याची पद्धत आहे, हे विशेष. या शिवस्तुतीचे एकूण ३१ श्लोक आहेत. प्रत्येक श्लोकांत म्हणजे शेवट हा 'तुजवीण शंभो मज कोण तारी' या आर्त हाकेने केला आहे. ही स्तुती शिवाची शक्ती आहे. स्तुती गाताना सहज भावसमाधी लागते. या सुंदर रचनेचा भावार्थही खूपच गोड आहे.

**कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुकुटी झळाळी ।**
**कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१।।**

हे भगवान शिवा, आपण कैलास पर्वतावर निवासी आपल्या मस्तकी चंद्रकोर आहे. नागाचा मुकुट आपल्या माथ्यावर असलेले आपण करुणेचे सागर आहात. तुमच्याशिवाय मला कोण तारणार?

**जटा विभूति उटि चंदनाची । कपालमाला प्रीत गौतमीची ।**
**पंचानना विश्व निवांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।३।।**

हे भगवंता, आपण आपल्या जटेमध्ये विभूती आणि चंदनाचा लेप लावलेला आहे. कपाळी माला आणि साक्षात गौतमी गंगा धारण केली आहे. आपण आपल्या पाच मुखाने विश्वाला शांति प्रदान करता.

**वैराग्ययोगी शिव शूलपाणी । सदा समाधी निजबोधवाणी ।**
**उमानिवासा त्रिपुरांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।४।।**
**उदार मेरु पति शैलजेचा । श्रीविश्वनाथ म्हणती सुरांचा ।**
**दयानिधीचा गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।५।।**
**ब्रह्मादि वंदी अमरादिनाथ । भुजंगमाला धरि सोमकांत ।**
**गंगा शिरीं दोष महा विदारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।६।।**

हे भगवंता, आपण हातात त्रिशूळ धारण केलेले वैराग्य योगी आहात. आत्मज्ञान देणारे उमेचे स्वामी पण सदैव समाधी अवस्थेत राहता. लोकांना त्रास देणाऱ्या त्रिपुरासुराचा वध करणारे आपण उदार आणि शैलजेचे पती आहात. गजचर्म धारण केलेले दयानिधी तुमच्याशिवाय मला कोण तारणार?

**कर्पूरगौरी गिरिजा विराजे । हळाहळें कंठ निळाचि साजे ।**
**दारिद्र्य दुःखे स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।७।।**
**स्मशानक्रीडा करितां सुखावे । तो देव चूडामणि कोण आहे ।**
**उदासमूर्ती जटाभस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।८।।**

हे प्रभो, आपल्या समिप कर्पुरगौर असणारी गिरिजा आई, हलाहलामुळे आपण नीलकंठ झालेले आहात. स्मशानात क्रीडा करणारे योगी आहात.

**भूतादिनाथ अरि अंतकाचा । तो स्वामी माझा ध्वज शांभवाचा ।**
**राजा महेश बहुबाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।९।।**
**नंदी हराचा हर नंदिकेश । श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।**
**सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।१०।।**

हे विश्वनाथ, आपणच भूतांचे स्वामी आणि यमाचाही अंत करणारे, नंदीचे स्वामी नंदीकेश्वर, देव तुम्हाला विश्वनाथ म्हणतात. आपण सदाशिव, सर्वव्यापी आणि ताप हरण करणारे आहात. हे भगवंता! आपण उग्ररूप, भीषणरूप, विक्राळरूप आणि दिगंबर अवस्थेत आहात. कामदेवाचा विनाश करणारे रुद्र विश्वंभर आहात. तुमच्याच इच्छेने संसार उत्पन्न आणि नष्ट होतो. हे उमापती, भैरव आपणच विघ्नविनाशक आहात. हे प्रभो, आपण भागीरथीच्या तीरावर विश्वनाथ रूपाने असणारे त्रिनेत्रधारी आहात. प्रयाग क्षेत्री त्रिवेणी आपल्या चरणांची पूजा करतात. तुझी स्तुती करण्यास मी अपात्र आहे. तू कैवल्यदाता असूनही मानवाला याची जाणीव नाही. तूच विश्वाचा नियंता आहेस. हे प्रभू! आपण तपस्वी, सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारे कामधेनू आहात. जो भक्त तुम्हाला भजतो त्याच्या सर्व इच्छा आपण पूर्ण करता. तुमच्याशिवाय मला कोण तारेल?

**विरामकाळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरीच धीर ।**
**चिंतामणी चिंतनें चित्तहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।**

हे महादेवा, आयुष्याच्या अखेरी शरीर विकल, मन उदास होते. अशावेळी तुम्ही चिंतामणी बनून सुखद अंत आणि सर्वदुःखे टाळून मला मुक्ती दे. हे फक्त तूच करू शकतो. हे शंभो! तुझ्यामुळेच ब्रह्मनाद गगनात भरून उरतो त्यामुळे माझी प्रपंच माया नष्ट होते. तुझी कथा कुमारी म्हणजे शुद्ध आणि पवित्र शक्ती आहे. हे महादेवा, कमरेला घंटामाळ, पिवळी वस्त्रे धारण केलेले आपण जिवाशिवाची अभंग समाधी लावत मायाचिंता नष्ट करता. गंभीर, धीरोदात्त, संकटांना न घाबरणारे, देवकुळाचे रक्षण करणारे तुम्हाला मंदार, बिल्व, बकुळ अशा विविध पुष्पांची माळा अर्पण करतो. हे प्रभो, तुला जाईजुई चंपक पुष्पमाळ धारण केलेले काशीनाथ आपणच आहात. आपल्या कानामध्ये अलक्ष्यमुद्रा म्हणजे साध्या डोळ्यांना न दिसणारी दिव्य कुंडले त्यामुळे भुरळ पाडणारे विलक्षण सौंदर्य आपले आहे.

**नागेशनामा सकळा जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळा ।**
**पंचाक्षरी घ्यान गुहाविहारीं । तुजवीण शंभो मज कोण तारी ।।२९।।**

इथे श्रीधरस्वामी आपले कुलदैवत तथा आपले वडील नागेश यांचे स्मरण नागेश्वराच्या रूपात करतात. 'नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राला सदैव हृदयरूपी गुहेत निवासी ठेवण्यास सांगतात.

**शास्त्राभ्यास नको श्रुति पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।**
**योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ।**
**काळाचे भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ।**
**ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडू नको ।।३१।।**

सर्वात शेवटी आपल्याला खूप सुंदर संदेश त्यांनी दिला. शास्त्रांचा अभ्यास किंवा वेदपठन नको, तीर्थयात्रेचीही आवश्यकता नाही. योगाभ्यास, व्रतवैकल्ये किंवा कठीण तपश्चर्या करण्याचीही गरज नाही. मनात काळाची भीती किंवा दुष्टांची शंका बाळगू नका. फक्त ज्याच्या केवळ स्मरणाने पापी लोकही तरून जातात, त्या भगवान श्रीशंभू महादेवाचा कधीही त्याग करू नका. हा त्यांचा उपदेश आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. ■

९८२२२६२७३५

## वेध

# एफडीएचा परवाना अंतिम हमी नव्हे!

**गिरीश शेरेकर**

नागरिकांच्या ताटात पोहोचणारा प्रत्येक घास सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्याला अपायकारक नसावा, ही मूलभूत अपेक्षा आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न हा केवळ परवाना आहे की नाही, इतक्यापुरता मर्यादित नाही. अन्न तयार करण्याची पद्धत, वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक, पाण्याची शुद्धता, खाद्य तेलाचा दर्जा, रंग व रसायनांचा वापर, कालबाह्य पदार्थांची विक्री, भेसळ, अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वच्छता आणि तयार अन्नाची सुरक्षित वाहतूक या सर्व बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. म्हणूनच अन्न व औषध प्रशासनाने (एफडीएने) केवळ परवाना आहे की नाही? या एका प्रश्नाभोवती आपली तपासणीची यंत्रणा फिरवणे पुरेसे नाही. एखाद्या खाद्यपदार्थ विक्रेत्याकडे वैध परवाना असणे ही अन्नसुरक्षेची सुरुवात आहे, पण अंतिम हमी नव्हे! परवाना मिळाल्यानंतर त्या आस्थापनात प्रत्यक्षात कोणत्या पद्धतीने अन्न तयार केले जाते, त्याची विक्री कशी केली जाते आणि नियमांचे पालन सातत्याने होते का, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. सर्वच शहरांमध्ये खाद्यपदार्थांच्या व्यवसायाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ, मेस, कॅटरिंग व्यवसाय, बेकरी, मिठाईची दुकाने, फास्ट फूड सेंटर, ज्यूस सेंटर, चहाच्या टपऱ्या, स्टॉल, किराणा दुकाने, डेअरी उत्पादने विकणारे, ऑनलाईन अन्नविक्री करणारे, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते अशा असंख्य माध्यमांतून नागरिकांच्या आहारात दररोज हजारो प्रकारचे पदार्थ पोहोचतात. या प्रत्येक टप्प्यावर अन्नसुरक्षेची जबाबदारी महत्त्वाची ठरते. अन्न व्यवसायासाठी आवश्यक परवाना किंवा नोंदणी असणे ही कायदेशीर आवश्यकता आहे. मात्र परवाना मिळाल्यानंतर त्या व्यवसायाला कायमस्वरूपी 'क्लीन चिट' मिळते, असा अर्थ काढणे धोकादायक आहे. व्यवसायाची परिस्थिती बदलू शकते, स्वयंपाकघरातील स्वच्छता कमी होऊ शकते, कच्चा माल निकृष्ट असू शकतो, साठवणुकीची पद्धत बदलू शकते किंवा नियमांचे उल्लंघन सुरू होऊ शकते. त्यामुळे परवाना तपासणीसोबतच प्रत्यक्ष आस्थापना तपासणी ही सातत्याने होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, एखाद्या मेस चालकाकडे परवाना असल्याचे तपासणीत आढळले, तरी त्याच्या स्वयंपाकघरातील पाण्याची गुणवत्ता, भांडी स्वच्छ आहेत का, कच्चे व शिजलेले पदार्थ स्वतंत्र ठेवले आहेत का, खाद्यपदार्थ योग्य तापमानावर साठवले जातात का, कामगारांची स्वच्छता आहे का, कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जाते का, खाद्यतेल किती वेळा वापरले जाते, अशा अनेक बाबी तपासणे आवश्यक आहे. परवाना असणे आणि अन्न सुरक्षित असणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. एफडीएच्या तपासणीचा केंद्रबिंदू हा नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण असला पाहिजे.

गेल्या तीन महिन्यात (जून ते ऑगस्ट) एफडीएने जवळपास राज्यातील १२ हजार ८३ अन्न उत्पादक व विक्रेत्यांची तपासणी केली. त्यापैकी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत ६०३ परवाने निलंबित करण्यात आले आणि सुमारे ८७५ जणांवर कारवाई करण्यात आली. जवळपास ६५ कोटींचा भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. याशिवाय राज्यातील २ हजार ९०२ औषध उत्पादन आणि विक्री केंद्रांची तपासणी करण्यात आली. त्यातील ६७७ परवाने निलंबित आणि २०३ परवाने रद्द करण्यात आले. सदर विभागाने कधी नव्हे ते इतके काम केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुकच आहे. या विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यामुळेच ते शक्य झाले आहे. आतापर्यंत झालेल्या कारवायांमध्ये सातत्य ठेवण्याची गरज आहे. खाद्यपदार्थांचा विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. त्यांच्यावर पण कारवाई करून त्यांना परवान्याच्या कक्षेत आणले पाहिजे. उघड्यावर पदार्थ विकणाऱ्यांसाठी काही नियम असले पाहिजे. ज्या विक्रेत्यांवर कारवाई झाली आणि त्यांनी परवाने काढले त्यांचीसुद्धा वेळोवेळी तपासणी आवश्यक आहे. परवानाधारक असूनही नियम धाब्यावर बसविणाऱ्या विक्रेत्यांवर तर कठोर कारवाई व्हायला हवी. विविध खाद्यपदार्थांचे नियमित नमुने घेऊन अधिकृत प्रयोगशाळांमध्ये तपासणी करण्यावर भर दिला पाहिजे. प्रत्येकालाच अन्नसुरक्षेची हमी पाहीजे आहे. प्रशासन आणि ग्राहक यांच्या समन्वयाने आणखी ठोस उपायोजना होऊ शकतात. त्यासाठी ग्राहकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा हा विषय खूप व्यापक आहे. तुकाराम मुंढे यांच्याकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत. त्या केव्हा पूर्ण होतील, याकडेच सर्वांचे लक्ष आहे. ■

९४२०७२१२२५

## विशेष

# 'नवे पुणे' : नियोजनातील नवा प्रयोग?

**प्रा. सुखदेव बखळे**

मुंबईनंतर नवी मुंबई उभी राहिली. नवी मुंबईनंतर तिसऱ्या मुंबईची संकल्पना पुढे आली आणि आता चौथ्या मुंबईच्या नियोजनालाही वेग आला आहे. याच पृष्ठभूमीवर आता 'नवे पुणे' उभारण्याची संकल्पना पुढे आली आहे. पुणे आज महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, शिक्षणाचे आद्य केंद्र, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे प्रमुख हब, ऑटोमोबाईल उद्योगाची राजधानी आणि स्टार्टअप इकोसिस्टिमचा महत्त्वाचा आधारस्तंभ बनले आहे. गेल्या दोन दशकांमध्ये पुण्याने ज्या वेगाने विकास केला, त्याच वेगाने शहराची लोकसंख्याही वाढली. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड, हिंजवडी, खेड-शिवापूर, तळेगाव, चाकण, रांजणगाव, लोणी काळभोर, उरुळी कांचन, वाघोली, खराडी, मुळशी अशा परिसरांमध्ये शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. परंतु 'नवे पुणे' म्हणजे नेमके काय, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. केवळ नवीन गृहनिर्माण प्रकल्पांचा समूह म्हणजे नवे पुणे नव्हे. नव्या शहराची संकल्पना म्हणजे स्वतंत्र अर्थव्यवस्था, रोजगाराची केंद्रे, सामाजिक सुविधा, शैक्षणिक संस्था, आरोग्य व्यवस्था, आधुनिक सार्वजनिक वाहतूक, पर्यावरणीय संतुलन आणि स्वयंपूर्ण नागरी व्यवस्थेची निर्मिती होय. नवे पुणे उभारताना सर्वप्रथम रोजगाराचा विचार करावा लागेल. शहरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला रोजच्या रोजगारासाठी जुन्या पुण्यात यावे लागणार असेल, तर वाहतूक कोंडी आणखी वाढेल. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहन उद्योग, संरक्षण उत्पादन, जैवतंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, हरित ऊर्जा, संशोधन संस्था आणि सेवा उद्योगांची स्वतंत्र केंद्रे नव्या शहरात निर्माण करावी लागतील. शहराची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण असेल, तरच त्याचा विस्तार यशस्वी ठरेल. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पायाभूत सुविधा आधी की वस्ती आधी या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. भारतातील बहुतेक शहरांचा अनुभव सांगतो की, आधी इमारती उभ्या राहतात आणि नंतर रस्ते, पाणी, सांडपाणी व्यवस्था, शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतूक यांचा विचार केला जातो.

नवे पुणे उभारताना ही चूक टाळली पाहिजे. प्रथम रस्ते, मेट्रो, 'बस रॅपिड ट्रान्झिट', जलपुरवठा, मलनिस्सारण, वीज, डिजिटल फायबर नेटवर्क, हरित क्षेत्रे आणि सामाजिक सुविधा उभारल्या गेल्या पाहिजेत. त्यानंतरच गृहनिर्माणाला परवानगी द्यावी. सिंगापूर, दक्षिण कोरियातील सॉन्गडो, संयुक्त अरब अमिरातीतील मसदार सिटी किंवा भारतातील चंदीगड, नवी मुंबई यांसारख्या नियोजित शहरांचा अभ्यास येथे उपयुक्त ठरू शकतो. ही शहरे केवळ इमारतींचे समूह नाहीत, तर भविष्यातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेली शहरे आहेत. पुण्यालाही अशाच दीर्घकालीन दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. पर्यावरण हा नव्या पुण्याचा सर्वात महत्त्वाचा आधार असला पाहिजे. आज पुण्याचा विस्तार होताना टेकड्या सपाट केल्या जात आहेत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह अडवले जात आहेत, झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होत आहे. पावसाळ्यात पूर आणि उन्हाळ्यात पाण्याची टंचाई ही त्याचीच परिणती आहे. नव्या पुण्याच्या आराखड्यात किमान ३० ते ४० टक्के क्षेत्र हरित पट्ट्यासाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. नदी, नाले, जलसाठे आणि जैवविविधता यांचे संरक्षण हा विकासाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. पाणी हा आणखी एक गंभीर प्रश्न आहे. आज पुणे शहराला धरणांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते. वाढत्या लोकसंख्येसाठी अतिरिक्त जलस्त्रोत कुठून आणले जाणार? पावसाच्या पाण्याचे संकलन, पुनर्वापर, सांडपाण्याचे शुद्धीकरण आणि उद्योगांसाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर ही तत्त्वे सुरुवातीपासूनच बंधनकारक केली पाहिजेत.



वाहतुकीच्या बाबतीत नवे पुणे हे खासगी वाहनांवर आधारित नसावे. जगभरातील आधुनिक शहरे सार्वजनिक वाहतुकीवर भर देत आहेत. मेट्रो, उपनगरी रेल्वे, इलेक्ट्रिक बस, सायकल ट्रॅक आणि पादचारी मार्ग यांचे जाळे आधी तयार झाले पाहिजे. प्रत्येक नागरिकाला १५ मिनिटांच्या अंतरात शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ आणि रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या '१५ मिनिटांचे शहर' या संकल्पनेचा विचारही करता येईल. डिजिटल पायाभूत सुविधा हेही नव्या शहराचे वैशिष्ट्य असले पाहिजे. स्मार्ट ट्रॅफिक सिस्टिम, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नागरी सेवा, ऑनलाईन प्रशासन, डिजिटल आरोग्य सुविधा, स्मार्ट वीज मीटर, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षम इमारती यामुळे शहराचा दीर्घकालीन खर्च कमी होईल; मात्र या सर्वांइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जमीन संपादन. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प जमीन अधिग्रहणामुळे रखडले आहेत. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्याशिवाय नवे पुणे उभे राहू शकणार नाही. केवळ भरपाई देऊन प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांना विकसित भूखंड, प्रकल्पातील भागीदारी, रोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा देणारे मॉडेल स्वीकारावे लागेल. अन्यथा, हा प्रकल्प वादग्रस्त ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक नवीन शहरांमध्ये उच्चभ्रू गृहनिर्माणाला प्राधान्य दिले जाते.

सरकारने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, नवे पुणे उभारणे म्हणजे जुने पुणे विसरणे नाही. पुण्यातील वाहतूक, नदी प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, अतिक्रमणे आणि अनियंत्रित बांधकामे या समस्या सोडवल्याशिवाय नवीन शहर उभारण्याचा संदेश जनतेपर्यंत सकारात्मक पद्धतीने पोहोचणार नाही. जुने शहर अडचणीत आणि नवीन शहर स्वप्नात, अशी स्थिती निर्माण होता कामा नये. नवे पुणे हे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे पुढील इंजिन ठरू शकते. मुंबईवरील ताण कमी करणे, जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे, उच्च तंत्रज्ञान उद्योगांना जागा उपलब्ध करून देणे आणि नियोजनबद्ध नागरीकरण घडवून आणणे यासाठी ही संकल्पना महत्त्वाची ठरू शकते; परंतु यासाठी राजकीय इच्छाशक्ती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पर्यावरणीय संतुलन आणि नागरिकांचा सहभाग हे चारही घटक तितकेच आवश्यक आहेत. आजचा प्रश्न 'नवे पुणे हवे की नको?' हा नाही. खरा प्रश्न असा आहे, की 'नवे पुणे कसे असावे?' जर ते पर्यावरणपूरक, तंत्रज्ञानसक्षम, रोजगारनिर्मिती करणारे, सार्वजनिक वाहतुकीवर आधारित, सर्वसमावेशक आणि स्वयंपूर्ण शहर असेल, तर ते महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा देऊ शकते; पण जर ते केवळ 'रिअल इस्टेट'चा विस्तार ठरले, तर पुण्याच्या विद्यमान समस्यांचीच पुनरावृत्ती होईल. म्हणूनच 'नवे पुणे' ही केवळ विकासाची संकल्पना नसून महाराष्ट्राच्या नागरी भवितव्याची कसोटी आहे. नियोजन, पर्यावरण, रोजगार, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधला, तर हे शहर भारतातील आदर्श नियोजित शहर ठरू शकते. या निमित्ताने एका प्रगतशील शहराची नेमकी उभारणी जवळून पाहायला मिळणार आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### युपीआय शुल्क द्यायला हवे

युपीआय शुल्कावरून फारच गदारोळ होतोय. का तर, युपीआय आधी निःशुल्क होते आणि ते निःशुल्कच राहावे हा दुराग्रह. याच दृष्टिकोनातून बघितले तर आयकर द्यायलाच नको. कारण कष्ट करून शिकणार आम्ही, स्पर्धा परीक्षा देऊ आम्ही, नोकरीकरिता वाट पाहू आम्ही, नोकरी लागल्यावर कष्ट करून काम करणार आम्ही; आणि तरीही मिळालेल्या वेतनावर आयकर घेणार तुम्ही; वा काय न्याय आहे? तसे म्हटले तर कोणताही कर द्यावयास लागूच नये. हो ना. एवढ्या साऱ्या सोयीसुविधा पुरविण्याकरिता यंत्रणा उभी करावी लागते. तिचा रखरखाव ठेवावा लागतो, काळानुसार बदल बदल करावे लागतात. आजचे सॉफ्टवेअर साधारणतः १८ महिन्यात कालबाह्य होते. ते जर काळानुरूप बदलले नाही तर ते आपण सहज वापरू शकणार नाही. कारण जुनी प्रणाली नवीन प्रणालीला मदत करीत नाही. जे देश विकसित आहेत त्या देशात फुकट काहीच मिळत नाही म्हणून ते विकसित आहे. या शुल्कातुन दोन बँक, सरकार, सेवा देणारी संस्था यांना २००० रुपयाच्या वरील ४ टक्के व्यवहारावर जो पैसा मिळेल खूप जास्त असणार आहे काय? यांचा एकंदर वार्षिक खर्च २१००० कोटी रुपये आहे (सरकारी आकडेवारी). त्या मानाने आवक काय आहे तर शून्य. शुल्कातून याची काही भरपाई झाली तर पूर्ण यंत्रणा सुरळीत राहू शकेल. युपीआयमुळे सुखाचे काय काम झाले? चाकरमान्याचा पगार बँकेत जमा होण्यास सुरुवात झाली. त्याला भरपूर काळ लोटला. पैसे काढण्यास किंवा बिल भरण्यास तीन-चार तास वाट पाहाव्या लागणाऱ्या रांगा संपल्या. या रांगेचा साक्षीदार म्हणून आज जे ५५-६० च्या पुढील वयाचे आहेत त्यांना विचारा. रकमेचे हस्तांतरण सुलभ झाले आणि अजून कितीतरी. निःशुल्क पाहिजे अशी राळ उठविणाऱ्या बुद्धिमानांचे(?) लक्ष मी एका दुसऱ्या बाबीकडे वेधू इच्छितो. गत आर्थिक वर्षामध्ये भारतातल्या सगळ्या बँकांनी मिळून ३७,००० कोटी रुपये कमाविले; अगदी अलगद. खात्यामध्ये कमीत कमी रक्कम नाही म्हणून, धनादेश परत फिरला तर पैसे वळते होतात. भारतातील सर्व बँका अनेक माहीत नसलेल्या शुल्कामधून जितके कमवितात त्या तुलनेत युपीआयला लागणारे शुल्क फारच कमी आहे. निःशुल्क सेवा ही कालबाह्य संकल्पना मेंदूतून काढून टाकायला हवी. आज जी सेवा मिळतेय त्यापेक्षा उत्तम सेवा भविष्यात मिळत राहो यासाठी शुल्क मान्य करा.

**राजेश्वर गोडे**/९१५८२३५६८७

■■■

### सर सलामत, तो पगडी पचास!

हिंदी भाषेतील ही म्हण गर्भित अर्थपूर्ण आहे. भारतीय संस्कृतीत पुरुष जातीच्या मस्तकावर मुंडासं, फेटा, टोपी (हॅट) पगडी आणि देवाला, राजाला मुकुट हे सन्मानाचे प्रतीक आहे. रक्षण करणारे पोलिस, जलसेना, वायुसेना, स्थलसेना किंवा अग्निशमन विभागातील जवान ते अधिकारी हे विविध प्रकारच्या टोप्या धारण करतात. त्यांना बघितल्यावर आपला हात सहजच सलाम करण्यासाठी वर होतो. बुद्धीचे स्थान हे शरीरातील मेंदूस्थानी शिरोभागी आहे. अत्यंत नाजूक असलेला पण महत्त्वाचा अवयव कठीण अस्थीच्या कवचाचे आत सुरक्षित असतो. बुद्धिवंत, उच्चविद्याविभूषित मनुष्याची वैचारिक पात्रता उच्च कोटीची, समाजाला दिशा देणारी, हित साधण्यासाठी असेल तर समाज त्यांचा अशाच पगड्या घालून जाहीर सन्मान करतो. उपरोक्त म्हणीत हाच अर्थ दडलेला आहे. मात्र, बुद्धिहीन, विकृत, मतभेद-मनभेद निर्माण करणारी किंवा हिंसक प्रवृत्तीची असेल तर असे पगडीऐवजी निषेध किंवा टीकेचे धनी होतात. मराठी बोली भाषेत डोक्यात माती गेली आहे का? डोके ठिकाणावर आहे का? डोक्यावर पडला आहे का? इत्यादी वाक्प्रचार अशाच प्रवृत्तीच्या मनुष्यासाठी उपयोगात आणले जातात. सध्या बुद्धीची देवता गणेशाचा उत्सव सुरू आहे. सर्वांना सुबुद्धी देऊन मस्तकी अशाच पन्नास पगड्या येऊ दे!

**संजय पाठक**/नागपूर

■■■

### अमेरिकन फुफाजींचा तीळपापड

नवी दिल्लीत पार पडलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेमुळे अमेरिकेत अस्वस्थता दिसून आली. अमेरिकन माध्यमे आणि वृत्तपत्रांतून ही चीड स्पष्टपणे जगासमोर येत आहे. ब्रिक्स हा अमेरिकेचे जागतिक वर्चस्व आणि डॉलरसाठी धोकादायक असल्याची डोनाल्ड ट्रम्प यांना जाणीव आहे. त्यांनी ब्रिक्स देशांना डी-डॉलरायझेशनच्या अनुषंगाने १०० टक्के आयात शुल्क लावण्याची धमकी दिलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रिक्स व्यापार मंचावरील भाषणात जगात वाढत असलेल्या व्यापार अडथळ्यांचा आणि एकतर्फी आयात शुल्क धोरणांचा उल्लेख करून ट्रम्पवर अप्रत्यक्षपणे टीका केली आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली आयोजित झालेल्या ब्रिक्स-२६ परिषदेत डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या विषयावर चर्चा झाली. ब्रिक्स-पे द्वारा सदस्य देशांच्या पेमेंट सिस्टिम्स एकमेकांशी जोडल्या जातील. भारताचा भर रुपयाचा वापर वाढवण्यावर आहे. भारताने ब्रिक्स मंचाचा वापर विकसनशील देशांचा आवाज बुलंद करण्यासाठी केलेला आहे. ट्रम्प तात्यांनी आपला झालेला तीळपापड लपवत 'सगळं काही व्यवस्थित होईल...' असं विधान केलेलं आहे. ब्रिक्समुळे नाराज झालेल्या अमेरिकन फुफाजींचे भविष्य खरे ठरल्यास संपूर्ण जगाला नक्कीच दिलासा मिळेल. ■

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफ करा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षातील १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केली आहे.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर निंबाळकर यांनी बुधवारी (दि.२३) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत ही मागणी केली. दुष्काळामुळे शेतकरी व शेतमजूर कुटुंबांच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च भागविणे पालकांना अडचणीचे ठरत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शिक्षण शुल्कासह परीक्षा शुल्क व इतर अनिवार्य शुल्कात संपूर्ण माफी द्यावी.

शुल्क भरता आले नाही म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश, परीक्षा अथवा निकाल रोखू नये, याबाबत शैक्षणिक संस्थांना स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

जिल्हा प्रशासनाने याबाबत शासन व संबंधित विद्यापीठाकडे तातडीने प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून निर्णय न घेतल्यास विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा निंबाळकर यांनी दिला.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# दोन दिवसांत दुष्काळाचा जीआर; शेतकऱ्यांना सरसकट मदतीची ग्वाही!

**मलकापूर-चोराखळी शिवारात मुख्यमंत्र्यांची घोषणा...**

**चारा, पाणी, शिक्षणाचीही जबाबदारी सरकारची : मुख्यमंत्री**



**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.२३ सप्टेंबर -**

पावसाअभावी यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीनसह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी राज्य सरकार भक्कमपणे पाठीशी उभे आहे. दुष्काळी परिस्थितीबाबत येत्या दोन दिवसांत शासन निर्णय (जीआर) काढून कोणतेही आडेवेडे न घेता सरसकट आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२३) मलकापूर-चोराखळी शिवारातील पाहणीदरम्यान दिली.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस धाराशिव जिल्हा दौऱ्यावर आले होते. दुपारी पावणेतीनच्या सुमारास त्यांनी मलकापूर-चोराखळी शिवारात नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या नुकसानीची माहिती घेतली.

पालकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार राणा जगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. चोराखळीचे पांडुरंग मैंदाड व मलकापूरचे रामहरी लोमटे यांनी पावसाअभावी सोयाबीनचे शंभर टक्के नुकसान झाल्याचे सांगितले. पिके हातची गेल्याने जनावरांच्या चाऱ्यासह कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून, तातडीने दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत व पीक कर्जमाफी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान थेट त्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्णय घेतले जात आहेत. राज्य सरकारने कर्जमाफीची प्रक्रिया सुरू केली असून शेवटच्या शेतकऱ्याच्या खात्यावर रक्कम जमा होईपर्यंत प्रक्रिया सुरू राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांचे ४८ हजार कोटी रुपयांचे वीजबिल माफ करण्यात आले असून दुष्काळाच्या काळात सरकार कोणतेही राजकारण करणार नाही, असे फडणवीस यांनी नमूद केले.

> **महामार्गाला छावणीचे स्वरूप...**
>
> मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर येरमाळा परिसरात मंगळवारपासूनच पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. महसूल, कृषी, महावितरण, जिल्हा परिषद आणि पोलिस प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तैनात होते. ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त, गस्तीची वाहने आणि सुरक्षा व्यवस्थेमुळे येरमाळ्यासह धुळे-सोलापूर महामार्गाला छावणीचे स्वरूप आले होते.

> **चारा-पाणी आणि मुलांच्या शिक्षणाचीही जबाबदारी...**
>
> मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. येत्या दोन दिवसांत जीआर काढून सरसकट आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला जाईल. जनावरांचा चारा, पिण्याचे पाणी आणि मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याचीही व्यवस्था सरकार करेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

> **'कोरडा दुष्काळ जाहीर करा'च्या घोषणा...**
>
> मुख्यमंत्र्यांच्या पाहणीवेळी मोठ्या संख्येने शेतकरी निवेदन देण्यासाठी आले होते. सुरक्षा व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना एका बाजूला थांबविण्यात आले. यावेळी आमदार कैलास पाटील व आमदार प्रवीण स्वामी यांनी कार्यकर्त्यांसह 'जाहीर करा, जाहीर करा, कोरडा दुष्काळ जाहीर करा' अशा घोषणा दिल्या. त्यामुळे काही काळ पाहणीस्थळी राजकीय वातावरण तापले.

# मुख्यमंत्र्यांसमोरच दुष्काळाच्या घोषणांचा एल्गार; मलकापूरमध्ये ठाकरे गट-भाजप आमने-सामने!

**आ. कैलास पाटील, आ. प्रवीण स्वामींसह शेतकऱ्यांची घोषणाबाजी...**

**सौम्य बळाचा वापर...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट आणि सत्ताधारी भाजप कार्यकर्ते आमनेसामने आल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

'धाराशिव जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा' या मागणीसाठी ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांसमोरच जोरदार घोषणाबाजी केली. त्याला भाजप कार्यकर्त्यांनी प्रत्युत्तर दिल्याने पाहणीस्थळी मोठा गोंधळ उडाला. मुख्यमंत्री दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधत असताना ठाकरे गटाचे लोकप्रतिनिधी व शेतकरी दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी पुढे आले. त्यांनी घोषणाबाजी सुरू केल्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही घोषणांनी प्रत्युत्तर दिले. त्यामुळे दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते समोरासमोर आले. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत दोन्ही गटांना दूर केले. यावेळी सौम्य बळाचा वापर करून गर्दी पांगविण्यात आली.

**दोरखंड लावून उबाठा गटाच्या आमदारांची अडवणूक**

दरम्यान, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घटनास्थळी जाऊन संतप्त शेतकरी व आमदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन तातडीने 'कोरडा दुष्काळ' जाहीर करावा, या मागणीवर ठाकरे गटाचे आमदार व शेतकरी ठाम राहिले. या गोंधळादरम्यान मुख्यमंत्र्यांनी घोषणाबाजीकडे दुर्लक्ष करत पाहणी दौरा पुढे सुरू ठेवला.

> **'निवेदन स्वीकारले नाही' : कैलास पाटील**
>
> आम्ही दुष्काळाच्या भीषण परिस्थितीबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी आलो होतो. मात्र, मुख्यमंत्र्यांनी आमचे निवेदन स्वीकारण्यास नकार दिल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी घोषणाबाजी केली. मलकापूर-चोराखळी दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांना पाहणीच्या ठिकाणी दोरखंड बांधून अडवण्यात आले. शेतकऱ्यांना अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारचा आम्ही जाहीर निषेध करतो, अशी प्रतिक्रिया आमदार कैलास पाटील यांनी दिली.

> **'दुष्काळ पाहणी की व्हीआयपी दौऱ्याचा सोपस्कार? : प्रविण स्वामी**
>
> मुख्यमंत्र्यांच्या पाहणीपूर्वी प्रशासनाकडून दोन टेबलांवर सोयाबीनचे पीक कापून ठेवण्यात आले होते. या प्रकारावर आमदार प्रवीण स्वामी यांनी आक्षेप घेतला. दुष्काळ पाहणी की व्हीआयपी दौऱ्याचा सोपस्कार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निषेध करतो, अशी प्रतिक्रिया आमदार कैलास पाटील यांनी दिली.

> **'राजकारण करण्याची वेळ नाही' : प्रताप सरनाईक**
>
> सध्याची परिस्थिती ही शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आहे. अशा संवेदनशील विषयावर राजकारण करण्याची ही वेळ नाही, असे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यात उमरगा-लोहारा 'आऊट'!

**शेतकऱ्यांचा सवाल : आमचा दुष्काळ दिसला नाही का?**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ सप्टेंबर -**

मराठवाड्यात पावसाने दीर्घ दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला असून, शेतकऱ्यांच्या पिकांची अवस्था बिकट झाली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांतील पीक-पाणी परिस्थितीची पाहणी केली. मात्र, धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाचा कृषी पट्टा असलेल्या उमरगा-लोहारा तालुक्याचा या दौऱ्यात समावेशच करण्यात आला नाही. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ पाहणीच्या नकाशावर उमरगा-लोहारा का नाही? असा सवाल उपस्थित होत आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात लातूर जिल्ह्यातील निलंगा व औसा तालुक्यांतील भागांची पाहणी करण्यात आली. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील करजखेडा आणि कळंब तालुक्यातील मलकापूर येथे पीक-पाणी परिस्थितीची पाहणी झाली. पुढे सोलापूर जिल्ह्यातील बार्शी व उत्तर सोलापूर तालुक्यांतील भागांचाही दौऱ्यात समावेश होता. मात्र, धाराशिवमध्ये येऊनही उमरगा-लोहारा तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या बांधावर मुख्यमंत्री पोहोचले नाहीत. उमरगा-लोहारा तालुक्यातही यंदाच्या पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. पावसातील दीर्घ खंडामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसह अन्य खरीप पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक भागांत पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच पाणीसाठे कमी होत असल्याने शेतीबरोबरच जनावरांचा चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. पावसाचा खंड, पिकांचे नुकसान आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शासनाकडून मदतीची अपेक्षा असताना मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष तालुक्यात येऊन परिस्थितीची पाहणी करावी, शेतकऱ्यांशी संवाद साधावा आणि त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात, अशी अपेक्षा होती.

शासनाकडून जाहीर होणाऱ्या मदतीत उमरगा-लोहारा तालुक्यातील प्रत्यक्ष नुकसानीचा विचार कितपत केला जातो, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मारुती खारवेंना 'प्रबुद्ध समाजरत्न' पुरस्कार

**नळदुर्ग, दि.२३ सप्टेंबर**

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते तथा नगरपालिकेतील काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'प्रबुद्ध समाजरत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. नांदेड येथील प्रबुद्ध परिवार टेंपल चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. ट्रस्टचे प्रमुख संजय खाडे यांच्या हस्ते खारवे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल नगरसेवक तानाजी जाधव व सुधीर हजारे यांच्या हस्ते खारवे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संजय विठ्ठल जाधव, संजय दशरथ जाधव, पद्माकर घोडके, सुहास येडगे, विलास येडगे, दादासाहेब बनसोडे, उत्तम बनजगोळे, युवराज जगताप आदी उपस्थित होते.



### वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रम, गुरुकुलात सेवाभावी उपक्रम

**परंडा, दि.२३ सप्टेंबर**

गिरीराज तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त 'गिरीराज तानाजीराव सावंत मित्रपरिवार'तर्फे वडकी (पुणे) येथील गंगातारा गुरुकुल व वृद्धाश्रमात विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले. यावेळी आश्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, मिठाई व खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेट भेट देण्यात आले. 'कार्यसिद्धी प्रतिष्ठान'च्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गिरीराज सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी उद्योजक चंद्रकांत सरडे, प्रा. प्रकाश धुमाळ, तुकाराम चव्हाण यांच्यासह मान्यवर व मित्रपरिवार उपस्थित होता.

### शिवसेना शेतकरी परिषद महाराष्ट्र राज्य संघटकपदी भैरवनाथ माडजे

**तुळजापूर, दि.२३ सप्टेंबर**



तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील युवा नेतृत्व भैरवनाथ माडजे यांची शिवसेना शेतकरी परिषद, महाराष्ट्र राज्याच्या संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे प्रदेशाध्यक्ष शंकर धोंडगे व प्रदेश उपाध्यक्ष रामजीवन बोंदर यांनी माडजे यांना नियुक्तीपत्र देऊन जबाबदारी सोपविली. माडजे हे ग्रामीण भागातील शेतकरी व सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने सक्रिय असून, त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर राज्यस्तरीय संघटनात्मक जबाबदारी देण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल तुळजापूर तालुक्यातून माडजे यांचे अभिनंदन होत आहे. युवा नेते ऋषिकेश मगर, सुजित हंगरगेकर यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले.



### भाजप कार्यालयात जहागीरदार यांच्या हस्ते गणपतीची महाआरती

**नळदुर्ग, दि.२३ सप्टेंबर**

नळदुर्ग येथील शहर भाजप कार्यालयात गणेशोत्सवानिमित्त प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या श्री गणपतीची दि. २२ सप्टेंबर रोजी उपनगराध्यक्ष नय्यर पाशा जहागीरदार यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी नय्यर पाशा जहागीरदार यांनी सध्या निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती दूर होऊन परिसरात मुबलक पाऊस पडावा, अशी प्रार्थना श्री गणेशाच्या चरणी केली. महाआरतीप्रसंगी पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव, संजय विठ्ठल जाधव, बबन चौधरी, विलास येडगे, सुहास येडगे, उत्तम बनजगोळे, अबु अलहसन रजवी, प्रमोद जाधव आदी उपस्थित होते.

### १५ हजारांची दुचाकी चोरीला

**कळंब, दि.२३ सप्टेंबर**

कळंब शहरातील कॅनरा बँकेसमोरून होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी कळंब पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी भास्कर शहाजी पुरेकर (वय ५७, रा. शेळका धानोरा) यांची एमएच १२ एलयू ४५४३ क्रमांकाची अंदाजे १५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल दि.२१ सप्टेंबर रोजी सायंकाळी कॅनरा बँकेसमोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

## मांजरा नदीवरील कॉपर वायर चोरीला; कळंबमध्ये गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील पिंपळगाव डोळा शिवारातील मांजरा नदीवरील फिनोलेक्स कंपनीची सुमारे ६ हजार रुपये किमतीची कॉपर वायर अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली.

फिर्यादी पोपट श्रीरंग सोमासे (वय ५६, रा. पिंपळगाव डोळा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २० सप्टेंबर रोजी रात्री ८ ते दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान खडकी शिवारातील मांजरा नदीवरून कॉपर वायर चोरीस गेली. याप्रकरणी सोमासे यांनी दि. २२ सप्टेंबर रोजी कळंब पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कळंब पोलिस करीत आहेत.

# कृष्णा-मराठवाडा प्रकल्पातील दोन्ही बोगद्यांची कामे तातडीने पूर्ण करा!

**भाजप नेते सुजितसिंह ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ सप्टेंबर -**

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत नीरा-भीमा जोड बोगदा आणि जेऊर बोगद्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भाजप नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या धाराशिव जिल्हा दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान ठाकूर यांनी पत्र देऊन विविध मागण्या मांडल्या.

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण विभागाची मान्यता, जलविज्ञान विभागाचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, कृष्णा पाणी वाटप तंटा लवादाची पाणी मान्यता तसेच निधीची तरतूद आदी बाबींतील त्रुटींमुळे प्रकल्प रद्दबातल झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांमुळे या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन झाले, असा दावा ठाकूर यांनी केला आहे.

मात्र, क्षेत्रीय स्तरावर दोन्ही बोगद्यांचे अंतिम टप्प्यातील काम गेल्या साडेतीन वर्षांपासून ठप्प आहे. जेऊर बोगद्याची एकूण लांबी २७ किलोमीटर असून केवळ ७०० मीटरचे काम बाकी आहे. तर नीरा-भीमा जोड बोगद्याची लांबी २३.६ किलोमीटर असून त्यातील अवघे १.६ किलोमीटर काम पूर्ण होणे बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामाला गती देऊन ते तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कृष्णा-मराठवाडा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ७ टीएमसी पाणी उपलब्ध झाल्यास धाराशिव जिल्ह्यातील सुमारे २५ हजार ८०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. मात्र, उजनी जलाशयात कृष्णेचे अतिरिक्त पाणी आल्याशिवाय धाराशिव जिल्ह्यात हे पाणी पोहोचणे शक्य नसल्याने त्यासाठीही आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी ठाकूर यांनी केली.

यासोबतच परंडा आणि भूम तालुक्यातील उपसा सिंचन योजना क्रमांक १ ते ५ ची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला द्यावेत, अशी मागणीही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. जिल्ह्यातील सातत्याने निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून सिंचन प्रकल्पांची रखडलेली कामे पूर्ण करणे महत्त्वाचे असल्याचे ठाकूर यांनी पत्रात नमूद केले आहे.

## 'शेतकरी मेळावा अपडेट

### मानवत येथे २७ सप्टेंबरला 'जल्लोष लोककलेचा' महोत्सव

**मानवत,/प्रतिनिधी :** बालरंगभूमी परिषद मुंबईच्या वतीने आणि बालरंगभूमी परिषद परभणी जिल्हा शाखेच्यावतीने रविवार २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता मानवत रोडवरील जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालयात 'जल्लोष लोककलेचा' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला बालरंगभूमी परिषदेच्या मध्यवर्ती शाखेच्या अध्यक्षा तथा चित्रपट अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांची विशेष उपस्थिती राहणार असून, आमदार सईद खान हे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रद्धा झिंजूरके आणि गटशिक्षणाधिकारी सुनील सत्यनारायण तोष्णीवाल यांची उपस्थिती राहणार आहे. बालकलावंतांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे तसेच लोककलेची समृद्ध परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात ६ ते १५ वर्षे वयोगटातील बालकलावंतांसाठी समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, वैयक्तिक नृत्य, वैयक्तिक वादन आणि वैयक्तिक गायन अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात येणार असून, सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने बालकलावंत या महोत्सवात सहभागी होणार असल्याने मानवत येथे लोककलेचा रंगतदार मेळा रंगणार आहे. बालकलावंतांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन 'जल्लोष लोककलेचा' महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद परभणी जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी शाखाध्यक्ष आबा ढोले, उपाध्यक्ष प्रा. नितीन लोहट, कार्याध्यक्ष उपेंद्र दुधगावकर, प्रमुख कार्यवाह त्र्यंबक वडसकर, सहकार्यवाह डॉ. अर्चना चिक्षे, कोषाध्यक्ष संजय पांडे, समन्वयक प्रमोद बल्लाळ, नागेश कुलकर्णी, मनीषा उमरीकर, प्रा. किशोर विश्वामित्रे, सचिन आढे, प्रकाश बारबिंड, दिनकर देशपांडे, संदीप राठोड, अनिकेत शेंडे, राजू वाघ, बालाजी दामुके यांच्यासह बालरंगभूमी परिषदेच्या सदस्यांनी पुढाकार घेतला आहे.

### यूपीआय व्यवहारांवरील प्रस्तावित चार्जला पेट्रोल-डिझेल डिलर्स संघटनेचा विरोध १५ ऑक्टोबरपासून दोन हजारांवरील व्यवहार रोख स्वरूपात स्वीकारण्याचा इशारा

**सेलू,/प्रतिनिधी :** शासनाच्या नवीन आदेशानुसार १५ ऑक्टोबर २०२६ पासून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के कर आकारण्यात येणार असल्याच्या निर्णयाला परभणी जिल्हा पेट्रोल-डिझेल डिलर्स संघटनेने विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने परभणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रस्तावित शुल्क मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, २०१७ पासून पेट्रोल डिलर्सच्या कमिशनमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. त्यातच वीज बिल, कर्मचाऱ्यांचे वेतन, विविध कर आणि इतर खर्चात मोठी वाढ झाल्याने पेट्रोल पंप व्यवसाय आर्थिक अडचणीत आला आहे. सध्या पेट्रोल पंपांवरील सुमारे ५० ते ७० टक्के व्यवहार यूपीआयद्वारे होत असल्याने दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहारांवर प्रस्तावित शुल्क आकारल्यास डिलर्सवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. या निर्णयाला राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील पेट्रोल डिलर्स संघटनांनीही विरोध दर्शविला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रस्तावित शुल्काचा निर्णय मागे न घेतल्यास १५ ऑक्टोबरपासून दोन हजार रुपयांवरील सर्व व्यवहार केवळ रोख स्वरूपात स्वीकारले जातील, असा इशारा संघटनेने दिला आहे.

पेट्रोल व डिझेलच्या व्यवहारांवर प्रस्तावित अतिरिक्त चार्ज आकारण्यात येऊ नये, यासाठी शासनाकडे संघटनेची भूमिका पोहोचवावी, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. निवेदनावर परभणी जिल्हा पेट्रोल व डिझेल डिलर्स संघटनेचे अध्यक्ष अमोल मुरलीधरराव भेडसुरकर आणि सचिव मिलिंद सावंत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### विसर्जन व्यवस्थेची महापौरांकडून पाहणी

**परभणी,/प्रतिनिधी :** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने वसमत रोड येथील जलशुद्धीकरण केंद्र परिसरात तयार करण्यात आलेल्या कृत्रिम हौदाची महापौर सय्यद इकबाल व उपमहापौर गणेश देशमुख यांनी पाहणी करून विसर्जन व्यवस्थेचा आढावा घेतला.

गणेश भक्तांना सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करता यावे, यासाठी महानगरपालिकेने कृत्रिम हौदाची व्यवस्था केली आहे. या ठिकाणी स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षितता तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधांची पाहणी महापौरांनी केली. तसेच विसर्जनाच्या काळात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# महिला शेतकऱ्यांना मिळणार हक्काची ओळख!

## महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमांतर्गत ऑनलाइन पोर्टलचा प्रारंभ; २ ऑक्टोबरला ग्रामसभेत प्रमाणपत्र वाटप

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** दि२१ शेतात राबणाऱ्या, उन्हा-पावसाची तमा न बाळगता धान्याची रास पिकवणाऱ्या राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या घामाला आता हक्काची आणि अधिकृत ओळख मिळणार आहे! महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीच्या ऑनलाइन पोर्टलचा भव्य शुभारंभ नुकताच १४ सप्टेंबर २०२६ रोजी राज्याच्या मा. कृषि मंत्र्यांच्या शुभहस्ते पार पडला. या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी योजना, कर्जे, विमा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

प्रत्यक्ष सहभागाला महत्त्व; केवळ जमिनीची मालकी आवश्यक नाही! आजवर शेतीतील प्रत्येक टप्प्यावर महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे असूनही जमिनीच्या मालकीअभावी त्या शासकीय योजनांपासून वंचित राहत होत्या. मात्र, या उपक्रमात केवळ जमिनीची मालकी हा निकष न ठेवता, शेतीतील प्रत्यक्ष सहभागाला सर्वोच्च महत्त्व देण्यात आले आहे. पिकांची लागवड, बीजोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन किंवा शेतमजुरी करणाऱ्या प्रत्येक महिलेला महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळणार आहे. अगदी भाडेपट्ट्याने वा बटाईने शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर आणि रोपमळा मजुरांनाही या योजनेचा थेट फायदा होणार आहे. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर सेवा संकल्प अभियान! दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभरात सेवा संकल्प अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत पात्र महिला शेतकऱ्यांची ओळख पटवून त्यांना प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास प्रोत्साहित केले जाईल. येत्या २ ऑक्टोबरच्या विशेष ग्रामसभेत या प्रमाणपत्रांचे अधिकृत वाटप केले जाणार आहे. ऑनलाइन अर्ज करण्याचे तालुका कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन तालुक्यातील सर्व पात्र महिला शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला (://...) भेट देऊन नोंदणी करावी. तसेच थेट अर्ज करण्यासाठी खालील लिंकवर जाऊन आपली माहिती भरावी: ऑनलाइन अर्ज भरताना काही अडचण आल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिंतूर तालुका कृषि अधिकारी . नितीन घुगे यांच्या वतीने करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक कष्टकरी महिलेने या योजनेचा लाभ घेऊन आपल्या हक्काचे प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## पोषणाचा संदेश अन् बालकांच्या चेहऱ्यावर हास्य; वडीतील अंगणवाडी मेळाव्याला ग्रामस्थांची गर्दी!

**पाथरी,/प्रतिनिधी-** 'नवचेतना बालक व पोषण आहार मेळावा' उत्साहात; बालविकास, किशोरवयीन मार्गदर्शन आणि लोकसहभागाचा सुंदर संगम वडी, येथील: बालकांचा किलबिलाट, आकर्षक रांगोळी, सुबक सजावट आणि पौष्टिक आहाराची विविधांगी मांडणी अशा उत्साही वातावरणात

वडी येथील अंगणवाडी क्रमांक ०३ मध्ये 'नवचेतना बालक व पोषण आहार मेळावा' उत्साहात संपन्न झाला. बालकांचा आनंद, पालकांमध्ये पोषणाबाबत जनजागृती, किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे मेळाव्याला विशेष स्वरूप प्राप्त झाले. मेळाव्याच्या निमित्ताने अंगणवाडी परिसराची स्वच्छता करून आकर्षक रांगोळी, सजावट, माहितीपर पोस्टर व बॅनर लावण्यात आले होते. ० ते ३ वर्षे वयोगटासाठी 'नवचेतना गट' तसेच ३ ते ६ वर्षे वयोगटासाठी 'आधारशीला गट' या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कृती व मनोरंजक उपक्रम घेण्यात आले. बालकांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. प्रास्ताविक आश्विनी गुंजवटीकर



यांनी केले, तर सूत्रसंचालन वडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय चिंचाणे यांनी केले. महिला व बालविकास विभागाच्या मंगला गायकवाड यांनी नवचेतना बालक मेळावा व पोषण आहाराचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. दळवी यांनी किशोरवयीन मुलींच्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. मेळाव्यात विविध पौष्टिक आहार पदार्थ आकर्षक पद्धतीने मांडण्यात आले होते. पोषण, बालविकास व आरोग्यविषयक माहिती देणारे पोस्टर-बॅनरही लक्षवेधी ठरले. त्यामुळे बालकांसोबतच माता-पालकांनाही पोषण व आरोग्याबाबत उपयुक्त माहिती मिळाली. यावेळी पर्यवेक्षिका गुंजवटीकर, दळवी, धनासुरे, देशमुख सर, नागलवाल सर, वडीच्या सरपंच सुशिलाबाई खंडागळे, शिलाताई शिंदे, माजी सरपंच चंदाताई कुटे, माजी सरपंच संगिता शिंदे, पोलीस पाटील हर्षाताई शिंदे यांच्यासह पाथरी पंचायत समिती कार्यालय अधिकारी,हादगांव बु.,पाथरगव्हाण, बाभळगांव व वाघाळा विभागातील सुपरवायझर,अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'माझं गाव, माझं योगदान' उपक्रमातील महिलांचा सक्रिय सहभाग हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. अंगणवाडी परिसराची स्वच्छता, सजावट, रांगोळी तसेच विविध उपक्रमांच्या नियोजनात महिलांनी उत्स्फूर्तपणे योगदान देत लोकसहभागाचा आदर्श निर्माण केला. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विजयमाला गिलबिले, मीरा पांचाळ, मिनाक्षी थावरे, उषा सावंत, सोनाली गायकवाड, अर्चना दुधगावकर, राजामती आव्हाड, मंजुळा आव्हाड, अर्पिता सुरवसे अंगणवाडी क्रमांक १,२,३ व शिंदेवस्तीनगर, महादेवनगर,अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी परिश्रम घेतले. बालकांचा किलबिलाट, पोषणाचा संदेश, किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे वडीतील हा मेळावा बालविकास, पोषण आणि लोकसहभागाचा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

## रावसाहेब उगले यांना जिल्हा उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**पूर्णा,/प्रतिनिधी:** शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच सामाजिक



आणि राष्ट्रीय कार्यात भरीव योगदान देणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुहागन, ता. पूर्णा येथील प्राथमिक शिक्षक रावसाहेब संभाजी उगले यांना नुकताच जिल्हा परिषद शिक्षण विभाग, परभणी यांच्या वतीने जिल्हा उत्कृष्टशिक्षक'आयडॉल टीचर पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रावसाहेब उगले यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसोबतच विविध सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे.या पुरस्कार सोहळ्यास पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई वाकळे, उपाध्यक्ष श्रीकांत विटेकर, शिक्षणाधिकारी श्रद्धा झिंझुरके, गटशिक्षणाधिकारी, किरण सुरोडवार तसेच विस्तार अधिकारी बालाजी कापशीकर,राहुल भालेराव केंद्र प्रमुख लोखंडे पिंपळा यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. उगले सरांच्या शैक्षणिक कार्याची आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच महसूल (कोतवाल) सेवक संघ राज्याचे अध्यक्ष शिवप्रसाद देवणे,विशाल कदम जिल्हाप्रमुख शिवसेना,नगराध्यक्षा विमलबाई कदम, आमदार रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळाचे तालुका प्रभारी नितीन कदम,नागसेवक ॲड .राजेश भालेराव, प्रकाश कांबळे,उत्तम खंदारे, मिलिंद कांबळे,दादाराव पंडीत,लक्ष्मीकांत कदम, भगवान सोळंके,पत्रकार संपत तेली,सतीश टाकळकर, ॲड.संजय गव्हाणे,हिराजी भोसले, बाळासाहेब उगले,प्रवीण कनकुटे,ॲड हर्षवर्धन ढगे या मित्रपरिवारासह परिसरातील नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## मुप्टा शिक्षक संघटनेच्या जिंतूर तालुका कार्याध्यक्षपदी प्रा. चव्हाण

**जिंतूर,/प्रतिनिधी:**





महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशन, शाखा जिंतूर यांच्या वतीने शिक्षकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व संघटनात्मक बळकटीसाठी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत प्रा. विनोद चव्हाण यांची मुक्ता शिक्षक संघटना, जिंतूर तालुका कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूर नगराध्यक्ष मा. श्री. प्रतापभैया देशमुख होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुक्ता शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय मा. श्री. सुनीलजी मगरे सर होते. यावेळी जिल्हाध्यक्ष श्री. माधव लोखंडे सर, जिल्हाध्यक्ष (ज्युनिअर) प्रा. अजय जोंधळे सर, जिंतूर तालुकाध्यक्ष मा. सय्यद अय्याज अली यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## जिंतूर तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा-शेवाळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा; सुरेखाताई शेवाळे यांची शासनाकडे मागणी तालुक्यात यंदा पावसाने मोठा खंड दिल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. अनेक भागांत खरीप पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके सुकण्याच्या अवस्थेत आहेत. या पार्श्वभूमीवर जिंतूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी शिवसेनेच्या महिला पदाधिकारी सुरेखाताई शेवाळे यांनी शासनाकडे करण्याची भूमिका घेतली आहे.



पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पिकांना पाण्याची गरज असताना पाऊस नसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.

सुरेखाताई शेवाळे यांनी शासनाकडे जिंतूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मांडण्याची भूमिका घेतली आहे. तसेच पावसाअभावी नुकसान झालेल्या खरीप पिकांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई व पीकविमा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात येणार आहे. दरम्यान, जिंतूर तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी यापूर्वीही विविध शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधींनी केली आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात जिंतूर तालुक्यात दीर्घकाळ पावसाचा खंड पडल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. तसेच परभणी जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी आंदोलनही केले आहे. तरी शासनाने लवकरात लवकर कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शिवसेनेच्या महिला पदाधिकारी सुरेखाताई शेवाळे टाले यांनी केली आहे

# श्री साईबाबा मंदिर संस्थानला तिर्थ क्षेत्राचा दर्जा देण्याकरिता भक्ताचे पालकमंत्र्यांना साकडे

**परभणी,/प्रतिनिधी-** गेली अनेक वर्षापासून ''साईधाम ''गंगाखेड रोड क्रांतीनगर परभणी येथे स्थित श्री साईबाबा मंदिर संस्थान अनेक भक्तांचे श्रद्धास्थान परिसरातील तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागातून भक्तांची गर्दी असते यातूनच या मंदिराला शासकीय सेवा सुविधा मिळवून देण्यासाठी तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची मागणी सर्व भक्तांनी दिनांक १७ सप्टेंबर गुरुवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमांतर्गत पालकमंत्री माननीय नामदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर निवेदन देण्यात आले.

श्री साईबाबा मंदिर संस्थान पन्नास वर्षांपासून साई धाम गंगाखेड रोड क्रांतीनगर येथे असून त् श्री साईबाबा मंदिर ची संकल्पना श्री साईबाबांचे निसिम भक्त साई दासानुदास साई सेवक ह भ प गुरुवर्य हिरानंद जी महाराज यांच्या संकल्पनेतून या मंदिर ची स्थापना करण्यात आली व भक्तांच्या नवसाला पावणारे साईबाबा अशी त्यांची व्याख्याईका आहे या मंदिर मध्ये दररोज चार आरत्या होतात तसेच वर्षाचे १२ महोत्सव होतात यामध्ये मुख्य श्रीराम नवमी पुण्यस्मरण महोत्सव गुरु पौर्णिमा दत्त जयंती आषाढी एकादशी कार्तिक एकादशी महाशिवरात्री यासारखे अनेक महोत्सव वर्षभरात चालत असतात दर गुरुवारी महाप्रसादाचा सोहळा असतो हे मंदिर शासनमान्य नोंदणी करत असून परभणी येथील धर्मदाय आयुक्त यांच्याकडे दिनांक ३०/७/ २००७ ला मंदिर संस्थांचे मुंबई अधिनियम १९५० अन्वे नोंदणी करण्यात आली असून धार्मिक कार्यक्रम सामाजिक कार्यक्रम शैक्षणिक कार्यक्रम वृक्षारोपण रक्तदान शिबिर घेतले जातात या मंदिराचा विकास मोठ्या प्रमाणात होऊ शकला नाही म्हणून सर्व भक्तांनी मिळून पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना साकडे यांना साकडे घातले व निवेदन दिले त्यांनी लवकरात लवकर या मंदिराचा कायापालट करून तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळून द्यावा अशी मागणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्य साधून पालकमंत्र्यांना देण्यात आले यावेळी परभणी जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी माननीय संजय सिंह चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये मंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले यावेळी श्री साईबाबा मंदिर संस्थानचे मुख्य विश्वस्त व श्री श्री १००८ महामंडलेश्वर श्री सच्चिदानंद सरस्वतीउर्फ डॉ अशोक पवार महाराज गो सेवा गो सेनेचे मराठवाडाकै छगन आप्पा जाधव चॅरिटेबल ट्रस्ट संस्थापक अध्यक्ष गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर गो शाळेचे संस्थापक संचालकमहाराष्ट्र राज्याचे मुख्य समन्वयक विजयकुमार खिस्ते पाटील



मारोतराव महाराज झाडगावकर पाटील गो प्रेमी ज्ञानोबा माऊली कदम पाटील संचालक समूह सर्वांचे मुख्य समन्वय गोसेवक विजय जोगदंड व इतर साईभक्त यांनी मिळून हे निवेदन देण्यात आले. लवकरात लवकर तीर्थक्षेत्राचा दर्जा दिल्यास भक्तांना अनेक सुविधा उपलब्ध होतील त्यांचे गैरसोय होणार नाही याकडे पालकमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधले होते. श्री साईबाबा मंदिर संस्थान ट्रस्ट ला तीर्थक्षेत्र क दर्जा मिळण्यासाठी शिफारस करणे बाबत.

महोदय:- वरील विषयी सविनय सविस्तर गेली पन्नास वर्षापासून श्री साईबाबा मंदिर संस्थानचे प्रत्येक वर्षी १२ कार्यक्रम याप्रमाणे कार्यक्रम चालतात या मंदिराची दैनंदिनी दुपारी बारा वाजता मध्यान आरती व सात वाजता धुपारती वाजता शेजारती. दररोज चार आरत्या अभिषेक महापूजा होम हवन व नित्य जप महोत्सव हा कार्यक्रम चालू असतो दर गुरुवारी महा अन्नदान कार्यक्रम चालू असतो यामध्ये शहरातील ग्रामीण भागातील परदेशातील अनेक भाविक भक्त सामील होतात यामध्ये आंध्र प्रदेश कर्नाटक मध्यप्रदेश बिहार या राज्यातील भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात या मंदिराचे स्थापना साई दासानुदास हिरानंद जी महाराज यांनी केली श्रीराम नवमी १९७८ ला केली त्यावेळेस पासून आतापर्यंत श्रीराम नवमी महोत्सव चा कार्यक्रम चालू असून वर्षभरातून हजारो भाविक भक्त श्री साईबाबांच्या मूर्तीचे दर्शन घेत असतात प्रत्येकाला आपापल्या प्रमाणे नवीन नवीन अनुभव आल्यामुळे वाढत असून त्यामध्ये सामाजिक उपक्रम त्यामध्ये वृक्षारोपण गरीब मुलांना शालेय शिक्षण साहित्य वाटप गणवेश वाटप मोफतआरोग्य शिबिर रक्तदान शिबिर महापुरुषांच्या जयंती तसेच श्रीराम नवमी महोत्सव श्री साईबाबा पुण्यस्मरण महोत्सव विजयादशमी गोकुळाष्टमी दत्त जयंती गुरुपौर्णिमा आषाढी एकादशी कार्तिकी एकादशी इत्यादी अनेक कार्यक्रम वर्षभरात चालत असतात सदरील मंदिराचे २००७ मध्ये केली असून मंदिराचे लेखा परीक्षण व विविध कार्यक्रमाची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या परवानगीनेच अनेक कार्यक्रम राबवले जातात तरी मेहरबान उपमुख्यमंत्री साहेब यांनी विशेष बाब म्हणून श्री साईबाबा मंदिर संस्थान ट्रस्ट साईधाम गंगाखेड रोड क्रांतीनगर परभणी या मंदिरास तीर्थक्षेत्राचा '' क दर्जा देण्यासाठी शिफारस करावी योजना मिळण्यासाठी मंदिराच्या सुविधा मिळण्यासाठी व भक्तांची गैरसोय टाळता येईल. मंदिरात होणारे दैनंदिन कार्यक्रम चांगल्या प्रकारे करता येतील तरी मेहरबान एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र अनेक मंदिरांना तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन मंदिर विकासासाठी निधी दिला असून आमच्या या मंदिराला निधी देऊन उपक्रम करावे या मंदिरातर्फे संत ज्ञानेश्वर अखिल भारतीयअध्यात्मिक वारकरी प्रशिक्षण व संशोधन केंद्रास मान्यता देऊन प्रकल्पास लागणारा निधी उपलब्ध करून द्यावा ही नम्र विनंती व श्री साईबाबा मंदिर संस्थान तीर्थक्षेत्र क चा दर्जा मिळवून देण्यात यावा ही नम्र विनंती.

आपलाविश्वासू

श्री साईबाबा मंदिर संस्थान (ट्रस्ट )

''साईधाम '' गंगाखेड रोड क्रांतीनगर परभणी.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# चिंतामणी गणपती परिसरात लोकसंवाद कार्यक्रमात योजनांचा जागर

## मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, बालविवाह कायद्याबाबत जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकसंवाद उपक्रमांतर्गत हिंगोली शहरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चिंतामणी गणपती मंदिर परिसरात लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा व आर्थिक मदतीबाबत तसेच चाईल्ड लाईन १०९८, बाल संगोपन योजना, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ संदर्भात नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे वैद्यकीय समन्वयक सोमनाथ पांडुरंग वानखेडे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीची माहिती दिली. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी कुठे संपर्क साधावा, अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे कोणती आहेत, तसेच अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती कशी मिळवावी, याबाबत त्यांनी नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन केले.

सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यपूर्ण जीवन जगता यावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणताही गरजू रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यरत आहे. हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गंभीर आजार, अपघात किंवा अन्य आरोग्यविषयक संकटामुळे कुटुंबावर अचानक आर्थिक भार पडल्यास पात्र रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळू शकते. त्यामुळे पैशाअभावी रुग्णांना वेळेत उपचार घेण्यात अडचण येऊ नये, यासाठी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र रुग्णांना दुर्धर व गंभीर आजारांवरील उपचारासाठी अर्थसहाय्य करण्यात येते. रुग्णांना मदतीसाठी मुंबईला जाण्याची आवश्यकता राहू नये, यासाठी १ मे २०२५ पासून प्रत्येक जिल्हास्तरावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यातूनच उपचारासाठी आर्थिक मदतीसाठी अर्ज करता येतो. तसेच अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहितीही जिल्हास्तरावरील कक्षातून मिळू शकते, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी चाईल्ड लाईन १०९८, बाल संगोपन योजना, बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ बाबत उपस्थित भाविक व नागरिकांना सविस्तर माहिती दिली. संकटात असलेल्या बालकांना मदत, संरक्षण व आवश्यक सेवा मिळवून देण्यासाठी उपलब्ध असलेल्या या सुविधेबाबत जनजागृती करण्यात आली. बालकांच्या सुरक्षिततेसाठी नागरिकांनी सतर्क राहून बालकांशी संबंधित कोणतीही अडचण किंवा गरज भासल्यास संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा माहिती कार्यालयाच्या उपसंपादक अलका पाटील यांनी केले. यावेळी कौशल्य विकास अधिकारी श्रीराम मगर, चिंतामणी गणपती देवस्थानचे अध्यक्ष सतिश लोहिया, सचिव दिलीप बांगर, संस्थानचे पदाधिकारी, जिल्हा माहिती कार्यालयाचे मनोहर भारती, मानसी राऊत, महिला व बाल विकास विभागाचे कर्मचारी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिध्दीविनायच्यावतीने विविध स्पर्धा, स्वच्छता अभियान

## गणेश मंडळात लोकसंवादचा स्तुत्य उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

श्री सिद्धिविनायक सार्वजनिक बाल गणेश मंडळ एनटीसी हिंगोलीच्या वतीने बालकांच्या कबड्डी स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा यासह उद्यान परिसरात स्वच्छता अभियान व हिंगोली पालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

गणेशोत्सव गणेशोत्सवाचे औचित्य साधून श्री सिद्धिविनायक सार्वजनिक गणेश मंडळ एनटीसी, हिंगोलीच्या वतीने व लोकसंवाद उपक्रमांतर्गत रविवार दि. २० सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरात समिती पदाधिकारी व सदस्यांनी स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण केले. यानंतर श्री. गणरायाच्या प्रांगणात हिंगोली पालिकेच्या २० महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना साडी चोळी देऊन सन्मान केला. पालिकेचे पंडित मस्के यांनी स्वच्छता, पाणी वाचवा, कंपोस्ट खत, सेंद्रिय शेती, सौर ऊर्जा या विषयावर उपस्थित भावीक भक्तांना मार्गदर्शन केले.यानंतर रात्री उशिरा लहान बालकांच्या गायन, वादन, नृत्य, एकांकिका व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी दुपारी बालकांच्या कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या यामध्ये तीन संघांनी प्रवेश घेतला होता.रात्रीला लहान मुली व महिलांच्या संगीत खुर्ची स्पर्धा संपन्न झाली विजेत्यांना शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

# वाहनावर दंडात्मक कारवाई केल्याने पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतुक पोलिसाने एका वाहनावर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईचा राग मनात धरून चालकाने पोलिस कर्मचाऱ्याला गंभीर मारहाण केली तसेच शिवीगाळ केली. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात बुधवारी संध्याकाळी चारजणांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी तसेच गणेशोत्सवाचा काळ असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी वाहतुक पोलिसांकडून शहरातील विविध चौकात तसेच वर्दळीच्या ठिकाणी वाहतुक पोलिस तैनात करण्यात आले असून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर पोलिस विभागाच्यावतीने कारवाई करण्यात येत आहे.

बुधवारी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोलिस कर्मचारी कपील संजय जाधव हे कार्यरत होते. यावेळी त्यांनी एका वाहन चालकावर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्या प्रकरणी दंडात्मक कारवाई केली. या कारवाईचा राग आल्याने वाहन चालक प्रमोद मांडगे रा पेडगाववाडी याने माझ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई का केली या कारणावरून वाद घालण्यास सुरूवात केली. यावेळी सतीश पडोळे, शाम साबळे, शिवशंकर दराउे हे देखील तेथे आले. यावेळी प्रमोद याने पोलिस कर्मचारी कपील जाधव यांना लोखंडी रॉडने डोळ्यावर, पोटावर, छातीवर मारहाण करून गंभीर जखमी केले. तर उर्वरित तिघांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी घटनास्थळी पोलिस अधिकाऱ्यासह इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. विशेष म्हणजे याठिकाणी महिला पोलिस कर्मचारी देखील उपस्थित होत्या. परंतु कार्यकर्त्यांना सत्तेचा एवढा माज आला की त्यांनी मागेपुढे न पाहता पोलिस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला केला. याप्रकरणी पोलिस कर्मचारी कपील जाधव यांनी दिलेल्या तक्रिारीवरून पोलिसांनी वरील चौघांवर शासकीय कामात अडथळा आणणे तसेच इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, उपनिरीक्षक युवराज वाघमारे, सपोउपनि संजय मार्के, जमादार अशोक धामणे यांच्या पथकाने आरोपींना ताब्यात घेतले आहे.



**हिंगोली– शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयाजवळील रेल्वे उड्डाणपूलाचे रस्ता रूंदीकरणाचे काम बंद आहे. रस्त्याची एक बाजू खोदून ठेवल्यामुळे पावसाचे पाणी साचले आहे. एकतर्फी वाहतुक सुरू असल्यामुळे वारंवार या मार्गावर वाहतुकीची कोंडी होत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिक्षक शंकर इंगोले यांचा गौरव सोहळा



कुरूंदा– शिक्षक दिनाचे औचित्य साधून राजु नवघरे प्रतिष्ठाणच्या वतीने तालुक्यातील गुणवंत व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा 'गुरुगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. वसमत येथील सुरमणी दत्ता चौगुले सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात आमदार राजू नवघरे यांच्या हस्ते विविध शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कुरुंदा येथील नरहर कुरुंदकर प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षक शंकर (माधव) श्रीराम इंगोले यांना यावर्षीचा गुरुगौरव पुरस्कार सहकुटूंब प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणारा महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचा गौरव व्हावा, या उद्देशाने आ. राजु नवघरे प्रतिष्ठाणच्या वतीने गुरुगौरव पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाच्या ओबीसी जिल्हाध्यक्षपदी हिंमत राठोड यांची निवड



हिंगोली– हिंगोली जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी विभाग जिल्हा अध्यक्ष पदी हिंमतराव राठोड यांची मुंबई येथे पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या उपस्थितीत अधिकृत नियुक्ती करण्यात आली. यावेळी कल्याणराव आखाडे (प्रदेशाध्यक्ष, ओबीसी विभाग), सौ. वैशालीताई नागवडे (प्रदेशाध्यक्ष, महिला विभाग), अनिल पतंगे (हिंगोली जिल्हा अध्यक्ष), रवींद्र गडदे (माजी उपसभापती), माजी नगराध्यक्ष राजकुमार देशमुख, अब्दुल्ला पठाण (जिल्हा अध्यक्ष, अल्पसंख्यांक विभाग), विजय डोखळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करून ओबीसी समाजाच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळवून देणार असल्याचे यावेळी हिंमत राठोड म्हणाले.

# २४ आणि २५ सप्टेंबर रोजी शहरातील वाहतुकीत बदल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

शहरातील गड्डेपीर गल्लीतील विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपती तसेच गणेशोत्सव निमित्ताने दि २४ व २५ सप्टेंबर रोजी शहरात दर्शनासाठी तसेच नवसाचा मोदक घेण्यासाठी जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची किंवा कोणताही अनुचीत प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता सदर कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा यांच्या आदेशाने दोन दिवस वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला आहे.

त्यामध्ये इंदिरा गांधी चौक ते अंबिका टॉकीज पर्यंत सर्व रस्त्यावरील वाहने पूर्णपणे बंद, गवळीपुरा जलेश्वर मंदिर ते महात्मा गांधी चौककडे जाणारा सर्व रस्त्यावरील वाहने पूर्णपणे बंद, तसेच जुने नगर पालिका चौक ते महात्मा गांधी चौकाकडे जाणारे सर्व रस्त्यावरील वाहतुक पूर्णपणे बंद, जुनी गोदावरी हॉटेल ते महात्मा गांधी चौकाकडे जाणारे सर्व वाहनांना वाहतुकीस मनाई करण्यात आली आहे. या मार्गावरील वाहनांना पर्यायी मार्ग म्हणून जवळा पळशी रोड येणारे वाहन खुशाल नगर, नवा मोंढा, रेल्वे स्टेशन रोडने येतील व जातील, कळमनुरी तसेच औंढा नागनाथ कडून येणारे वाहने नांदेड नाका, जिल्हा परिषद रोडने येतील व जातील, वाशिम कडून येणारे वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हा परिषद रोड, नांदेड नाका मार्गे येतील व जातील. सदरील वाहतुक दि २४ सप्टेंबरच्या दुपारी २ वाजल्यापासून ते २५ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजेपर्यंत करण्यात आला असून या पर्यायी मार्गाचा नागरिकांनी तसेच वाहन धारकांनी वापर करावा तसेच सहकार्य करावे असे आवाहन पोलिस अधीक्षक लोढा यांनी केले आहे.

# फ्लेवर्ड मिल्क निवीदेची चौकशी करा विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सीलची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहांसह निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना दूध पुरवठ्यासाठी राबविण्यात आलेल्या नवीन निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून शासनाच्या आर्थिक हिताचे संरक्षण करावे, अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्यावतीने करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकारी हिंगोली व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले आहे. तसेच मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव आणि आयुक्त समाज कल्याण, पुणे यांनाही निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

राज्यातील शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमधील सुमारे ६५ हजार २६३ विद्यार्थ्यांना दूध पुरवठा करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद आहे. पूर्वीची दूध पुरवठ्याची निविदा प्रक्रिया शासनाच्या मंजुरीसाठी प्रलंबित असताना ती रद्द करून फ्लेवर्ड मिल्क पुरवठ्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे.

नवीन प्रक्रियेत पराग मिल्क फूड लिमिटेड, पुणे व वारणा सहकारी दूध उत्पादन प्रक्रिया संघ लि., कोल्हापूर यांना प्रति २०० मिली फ्लेवर्ड मिल्कसाठी २६.५० रुपये दराने पुरवठा आदेश देण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या दरामुळे शासनावर दररोज अंदाजे १७.२३ लाख, वार्षिक ६२.९४ कोटी आणि तीन वर्षांत सुमारे १८८ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, या आकडेवारीची शासनस्तरावर स्वतंत्र पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पूर्वीची निविदा रद्द करण्याचे कारण, नवीन निविदेची आवश्यकता, दर व गुणवत्तेची तुलनात्मक तपासणी, निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता तसेच शासनाच्या आर्थिक हितास बाधा पोहोचली आहे का, याची चौकशी करावी. विद्यार्थ्यांना दर्जेदार व पौष्टिक दूध मिळण्याबरोबरच सार्वजनिक निधीचा काटकसरीने वापर व्हावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हा अध्यक्ष शेख बासित, उपाध्यक्ष रवि जैस्वाल, शेख अवेज, जिल्हा प्रमुख महासचिव शेख शाहनवाज, शहर अध्यक्ष पठाण साजिद खान, महासचिव सतीश लोणकर, शेख अफरोज आदी पदाधिकारी व स्वयंसेवकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दोन गंभीर घटना, कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह वसमत शहराला खमक्या पोलिस अधिकाऱ्याची गरज?

**तभा वृत्तसेवा**
**वसमत २३ सप्टेंबर**

वसमत शहरात मागील काही दिवसांपासून घडणाऱ्या गंभीर घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शुक्रवारी सकाळी पूर्णा पाटबंधारे विभागाच्या जुन्या विश्रामगृहाजवळ एका ३३ वर्ष युवकाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मृतदेहावर जखमांच्या खुणा आढळल्याने घातपाताची शक्यता व्यक्त होत असली, तरी मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच वसमत शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले,स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही पाहणी करून तपासाला सुरुवात केली आहे. पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येत असून, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

मात्र, या घटनेमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. अवघ्या आठवडाभरापूर्वी पोलिसांना माहिती (टिप) दिल्याच्या संशयातून एका युवकाचा खून झाल्याची घटना घडली होती. त्या घटनेची चर्चा अद्याप सुरू असतानाच पुन्हा एका युवकाचा संशयास्पद मृत्यू समोर आल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यांत शहरात भर दिवसात चोरी, घरफोडी, दुकानांचे शटर फोडणे आणि मारामारीसारख्या घटनांची चर्चा सातत्याने होत असून आठवड्यात दोन खून झाल्याचे समोर आली आहे.

दोन्ही युवकांच्या घटनांचा परस्पर संबंध आहे का? किंवा नाही, हे तपासातूनच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे कोणत्याही निष्कर्षापूर्वी पोलिस तपास आणि उपलब्ध पुराव्यांनाच महत्त्व देणे आवश्यक आहे.

मात्र, या घटनांच्या पार्श्वभूमीवर वसमत शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी पोलिस नेतृत्वाकडून आता ठोस आणि दृश्यमान पावले उचलली जाणार का? हा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चिचा विषय बनला आहे.

कायद्याचा धाक कायम ठेवणे, नागरिकांचा विश्वास मजबूत करणे आणि गुन्हेगारी घटनांना प्रतिबंध घालणे यासाठी अधिक सक्रिय, तत्पर आणि प्रभावी पोलिसिंगची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे वसमत शहराला सध्याच्या परिस्थितीत अधिक खमक्या आणि सक्रिय पोलिस नेतृत्वाची गरज आहे का? हा प्रश्न आता केवळ चर्चेपुरता न राहता पोलिस प्रशासनासमोरचा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे?दरम्यान जिल्ह्याचे पोलीसअधीक्षक श्राणिक लोढा यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

युवकाच्या संशयास्पद मृत्यूचे नेमके कारण तपासानंतरच स्पष्ट होणार असून, या प्रकरणाचा तपास किती वेगाने आणि कोणत्या दिशेने पुढे जातो, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# बेकायदेशीर वीटभट्टी बंद करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ सप्टेंबर**

कळमनुरी येथील सर्व्हे क्रमांक २१ ब मध्ये शेख शकील शेख खलील यांनी अनेक वर्षापासून फयाजोद्दीन सिद्दीकी व अब्दुल गफार यांच्या हिश्यात अवैधरित्या, बेकायदेशीर, आवश्यक परवानग्या न घेता वीटभट्टी सुरू केली आहे. यामुळे परिसरात वायु प्रदुषण, शेतीचे नुकसान, माती उत्खनन व नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. सदर वीटभट्टी बंद करून संबंधितांची चौकशी करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर शमशीर अली खान, मुजीब पठाण, अबुबकर कुरेशी, फारूख पठाण,फेरोज पठाण, नुरखान पठाण, जुनेद पठाण, शेख अमीर, जमील खान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# २४ तासांत बॅनर, पोस्टर्स हटविण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ सप्टेंबर -**

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनी विविध शासकीय विभागांच्या प्रमुखांना दिले.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पदवीधर, शिक्षक तसेच स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकांनाही आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू आहेत. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही शासकीय यंत्रणेकडून आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

पदवीधर मतदारांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव पडेल अशी कोणतीही नवीन शासकीय योजना किंवा धोरण जाहीर अथवा मंजूर करू नये. तसेच पदवीधर मतदारसंघातील शैक्षणिक संस्थांचे उद्घाटन किंवा पायाभरणी मंत्री महोदयांच्या हस्ते करू नये. निवडणूक कामाशी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मंत्र्यांच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बोलावू नये, अशाही सूचना देण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांची बैठक किंवा व्हिडिओ कॉन्फरन्स मंत्री महोदयांमार्फत आयोजित करू नये. अत्यावश्यक नियमित बैठका केवळ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने घेता येतील, असे स्पष्ट करण्यात आले.

**नवीन कामांना मंजुरीवर निर्बंध**

खासदार, आमदार व विधानपरिषद सदस्य निधी योजनेंतर्गत आयटी प्लॅटफॉर्मद्वारे कोणत्याही नवीन कामास मंजुरी देऊ नये. तसेच निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांवर निवडणूक जाहीर झाल्यापासून पूर्ण बंदी राहील. अपरिहार्य कारणास्तव बदली करणे आवश्यक असल्यास आयोगाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहणार आहे.

काळ्या पैशाच्या तसेच पैशाच्या गैरवापराच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करावी. मतदारांना हॉटेल, रिसॉर्ट अथवा तत्सम ठिकाणी ठेवण्याची बाब लाचखोरी समजली जाईल. अशा प्रकार आढळल्यास संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई केली जाईल.

## औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुक

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून शासकीय मालमत्तेच्या विरुपनास प्रतिबंध केले आहे. महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, बीएसएनएल तसेच सर्व शासकीय व निमशासकीय विभागांच्या मालमत्तेवर लावण्यात आलेले राजकीय स्वरूपाचे फलक, कापडी बॅनर्स, पोस्टर्स आदी तात्काळ काढून टाकावेत, असे निर्देश देण्यात आले.

विभागाच्या अधिनस्त मालमत्तेचे विरुपन झालेले नाही, याची संबंधित विभाग प्रमुखांनी खात्री करून प्रमाणित करावे. त्यानंतरही अशा प्रकारचे लिखाण झाल्यास संबंधि कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी. कारवाईत कुचराई किंवा दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवरही नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

**शासकीय वाहनांचा गैरवापर टाळण्याचे निर्देश**

आचारसंहितेच्या काळात कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय वाहनाचा निवडणूकविषयक कामासाठी गैरवापर होणार नाही, याची कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. पदाधिकाऱ्यांची वाहने जमा करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. शाळांच्या मैदानांव्यतिरिक्त नेहमी सभांसाठी वापरली जाणारी मैदाने व मोकळ्या जागा सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करून द्याव्यात, असेही स्पष्ट करण्यात आले.

शासकीय विश्रामगृहे, शाळांची मैदाने आणि इतर शासकीय इमारतींच्या वापराबाबत निवडणूक आयोगाने घातलेल्या निर्बंधांचे तंतोतंत पालन करावे. कोणत्याही राजकीय कार्यक्रमासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहू नये, असे निर्देश देण्यात आले.

निवडणूक कालावधीत वाहनांचा गैरवापर रोखणे, ताफ्यांचे नियमन करणे तसेच प्रचाराचा कालावधी संपल्यानंतरच्या ४८ तासांत राजकीय पदाधिकाऱ्यांच्या मतदारसंघातील उपस्थितीवरील निर्बंध या तरतुदी पदवीधर मतदारसंघालाही लागू राहतील.

**२२ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत आचारसंहिता**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार २२ सप्टेंबर २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन करावे. यासाठी आवश्यक पूर्वतयारी करून आचारसंहिता विषयक पथके स्थापन करावीत, तसेच सर्व सूचना अधिनस्त कार्यालये, अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून काटेकोरपणे पाळल्या जातील, याची दक्षता घ्यावी.

विभागाशी संबंधित शासकीय योजना तसेच आचारसंहितेचा भंग करणारे बॅनर, पोस्टर्स अथवा अन्य प्रचार साहित्य आढळल्यास ते २४ तासांच्या आत काढून टाकावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बैठकीत दिले. आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर सेवाविषयक नियमानुसार तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले.

**राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचीही बैठक**

या बैठकीपूर्वी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व आचारसंहितेतील विविध तरतुदींची माहिती देण्यात आली. तसेच निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# आ. भीमराव केराम यांच्या पाठपुराव्यामुळे गरीब आदिवासी विद्यार्थ्यांच्या एमबीबीएसचा मार्ग मोकळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ सप्टेंबर -**

अतिदुर्गम आदिवासी भागातील गरीब व गुणवंत विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आमदार भीमराव केराम यांनी आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे विशेष बाब म्हणून एमबीबीएस शिक्षणाची फी भरण्यासाठी स्वतंत्र व कायमस्वरूपी आर्थिक तरतूद करण्याची मागणी केली होती. या मागणीची मंत्री उईके यांनी तातडीने दखल घेत प्रकल्प अधिकारी, किनवट यांनी प्रकरण तपासून प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले आहेत.

किनवट तालुक्यातील कु. रेखा अर्जुन कनाके व कु. मनीषा विजय वाळके या गरीब व गुणवंत



विद्यार्थिनींनी प्रतिकूल परिस्थितीत वैद्यकीय प्रवेश परीक्षेत यश मिळवून निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस अभ्यासक्रमास प्रवेश मिळविला आहे. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने महाविद्यालयाची अवाढव्य फी भरणे त्यांच्या पालकांसाठी मोठे आव्हान ठरले आहे. पहिल्या वर्षाची फी मोठ्या अडचणीने भरल्यानंतर आता दुसऱ्या वर्षाच्या फीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

केवळ आर्थिक परिस्थितीमुळे या विद्यार्थिनींचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अधुरे राहू नये, यासाठी आमदार केराम यांनी मंत्री उईके यांना पत्र देऊन दोन्ही विद्यार्थिनींची फी 'विशेष बाब' म्हणून मंजूर करण्याची मागणी केली. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या न्यूक्लियस बजेट अथवा विशेष निधीतून स्वतंत्र, नियमित व कायमस्वरूपी आर्थिक सहाय्य योजना सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली.

आमदार केराम यांच्या पत्राची तत्काळ दखल घेत मंत्री अशोक उईके यांनी किनवटच्या प्रकल्प अधिकाऱ्यांना संबंधित प्रकरणाची तपासणी करून आवश्यक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे रेखा कनाके व मनीषा वाळके यांच्या एमबीबीएस शिक्षणासाठी आर्थिक मदतीची अपेक्षा निर्माण झाली आहे.

**कायमस्वरूपी योजनेची मागणी**

ही दोन प्रकरणे केवळ उदाहरणे असून राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागातील अनेक गरीब व गुणवंत विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी व अन्य व्यावसायिक शिक्षण घेत आहेत. अवाढव्य शुल्कामुळे त्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी कायमस्वरूपी आर्थिक सहाय्याची योजना सुरू करण्याची मागणी आमदार केराम यांनी केली आहे.

# मुदखेड नगरपरिषद प्रभागात ६ कोटींच्या विकासकामांचे केवळ 'भूमीपूजन'; प्रत्यक्ष काम अद्याप ठप्प, नागरिकांचा संताप!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २३ सप्टेंबर -**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती सुधार योजनेअंतर्गत तसेच इतर निधीतून मुदखेड शहरात कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे नारळ फुटले, परंतु निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घाईगडबडीत करण्यात आलेली भूमिपूजने आता केवळ फलकांपुरतीच उरली आहेत. जवळपास ६ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली होती.काही कामे झाली आहेत तर काही कामे रखडलेली आहेत. तर कामे अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नसल्याने नागरिक व प्रभागातील रहिवाशांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

८५ भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण, खासदार अशोकराव चव्हाण व इतर मान्यवरांच्या हस्ते मुदखेड नगरपरिषद




क्षेत्रातील विविध विकासकामांचा भूमीपूजन सोहळा पार पडला होता. या अंतर्गत प्रभाग क्रमांक तीन मधील स्मशानभूमी विकसित करणे, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम करणे (अंदाजित किंमत ४१.२३ लक्ष) व शौचालयाचे बांधकाम करणे (अंदाजित किंमत २७.१६ लक्ष) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विकासकामांचा समावेश होता.

नगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर मोठा थाटमाट करून या कामांचे भूमीपूजन करण्यात आले, मात्र भूमिपूजनाचा फलक उभा राहण्याव्यतिरिक्त प्रत्यक्ष जागेवर एक पोकलेन किंवा कामगारही दिसलेला नाही. रस्ते, स्वच्छता व स्मशानभूमीचे काम रखडल्यामुळे नागरिकांना दररोज विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.

६ कोटींचा निधी मंजूर होऊन भूमिपूजन झाले, मग प्रत्यक्ष काम सुरु का होत नाही? हा केवळ निवडणुकीपुरता केलेला स्टंट होता का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. प्रशासनाने व संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन तत्काळ प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.

## पवित्र पोर्टलद्वारे प्रणिता मोरे यांची उच्च शिक्षिका पदी निवड

**सोनखेड** -येथील सौ.प्रणिता नारायण मोरे यांची उच्च प्राथमिक पदवीधर शिक्षक पदी निवड झाली आहे. नुकत्याच महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून २१ सप्टेंबर रोजी पवित्र पोर्टल अंतर्गत प्रकाशित झालेल्या यादीत रयत शिक्षण संस्था जि.सातारा येथे इयत्ता ६ ते ८ वी या वर्गासाठी उच्च प्राथमिक पदवीधर शिक्षिका म्हणून सौ.प्रणिता मोरे यांची निवड झाली आहे त्यामुळे मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी या म्हणीप्रमाणे माहेरी आपले शिक्षण पूर्ण करून सोळा वर्षाच्या अथक परिश्रमानंतर त्यांनी हे यश संपादन करून सौ.मेघाबाई बळवंतराव देशमुख जि.यवतमाळ (माहेर) व सौ.निर्मलाबाई शिवरामजी मोरे रा.सोनखेड ता.लोहा जी.नांदेड (सासर) या दोन्ही घरची जबाबदारी सांभाळत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आणि दोन्ही घराण्यांचे नाव उज्वल केले आहे त्यामुळे त्यांच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रमंडळी व आप्तेष्टाकडून त्यांचे अभिनंदन करून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## शिव गणेश मंडळ हाडको येथे आरोग्य शिबिराचा शेकडो रुग्णांनी घेतला लाभ

**नवीन नांदेड** -शिव गणेश मंडळ वैभव नगर हडको येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २३ सप्टेंबर रोजी मातृसेवा आरोग्य केंद्र सिडकोच्या वतीने हाडको येथे आरोग्य शिबिर घेऊन रुग्णावर औषधोपचार करून रक्ताच्या विविध तपासण्या करण्यात आल्या यावेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी यांनी विविध तपासणी करण्यात आल्या. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मदाय आरोग्य मदत कक्ष सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या समन्वयाने श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६ दिनांक १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिर अडको येथे शिव गणेश मंडळ वैभव नगर जे-२ व जे-३ चा राजा येथे दिनांक २३ रोजी सकाळी नऊ ते एक पर्यंत सदरील शिबिरात विविध आजारांच्या रुग्णांच्या तपासण्या तज्ञ डॉक्टरांकडून करून रोग निदान शिबिरा नंतर आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया रक्त व लघवीच्या वेगवेगळ्या तपासण्या व ईसीजी तपासून मात्र सेवा आरोग्य केंद्र सिडकोच्या वतीने करण्यात आले यावेळी अवघे केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे परिचारिका प्रियंका रच्चेवार , जयश्री दरेगावे यांच्यासह आरोग्य कर्मचारी गलपवाड, सुखदेव जोंधळे, ओम सूर्यवंशी यांच्यासह आशा वर्कर यांनी हे शिबिर यशस्वीरित्यापार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच सदरील आरोग्य शिबिर पार पाडण्यासाठी शिव गणेश मंडळाचे अध्यक्ष प्रवीण खोकले उपाध्यक्ष संभाजी तेलंग, विशाल डाखोरे, गौतम पवार यांनी सहकार्य केले.



## प्रतिबंधित क्षेत्र घोषित

**नांदेड** -ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ब्रह्मपुरी शेत सर्व्हे नं. ४४/१ व ४४/२ जवळील गोदावरी नदीच्या पात्रातील खडक असलेल्या ठिकाणी पूजा-अर्चा करण्याच्या कारणावरून महानुभाव पंथीय व मुस्लिम समाजामध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये सदर परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.

# हिमायतनगर तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २३ सप्टेंबर -**

तालुक्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दिलेल्या उघडीपीमुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, ऊस, उडीद, मूग, तूर, ज्वारी, मका, हळद आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने दि २३ सप्टेंबर रोजी तहसीलदार पल्लवी टेमकर यांना निवेदन देण्यात आले. काँग्रेस तालुका अध्यक्ष गजानन सूर्यवंशी व



शहराध्यक्ष संजय माने यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला असून त्यामुळे शासनाने परिस्थितीची दखल घेऊन तातडीने मदत करावी अशी मागणी करण्यात आली.

काँग्रेसच्या वतीने हिमायतनगर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करणे, सर्व पिकांचा पीक विमा तत्काळ मंजूर करणे, शेतकऱ्यांना हेक्टरी १.२५ लाख रुपयांची मदत जाहीर करणे, नवीन पीक कर्ज मंजूर करणे, पीक कर्जासाठी लागणाऱ्या विविध शुल्कांमध्ये माफी देणे, तालुक्यात चारा छावण्या सुरू करणे तसेच रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे. यावेळी मोठ्या प्रमाणामध्ये काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २३ सप्टेंबर -**

तालुक्यात यावर्षी पावसाअभावी शेतकऱ्यांची खरीप पिके होरपळून गेली असून कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रमुख मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घंटा आंदोलन करण्यात आले असून शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये अनुदान तात्काळ देण्याचे लेखी निवेदन तहसील प्रशासनाला देण्यात आले आहे.

यावर्षी गेल्या दोन महिन्यापासून पाऊसच पडला नसल्याने शेतातील खरीप पिके अक्षरशः करपली आहेत. लागवड खर्चही निघणार नसल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. परंतु याबाबत शासन कोरड्या दुष्काळासंदर्भात कोणतेही ठोस पावले उचलत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.२३ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात घंटा आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. या अनुषंगाने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी लोकसभा खासदार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण यांच्या आदेशान्वेय तसेच काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ.विठ्ठल पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात काँग्रेसच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी लक्षवेधी आंदोलन केले आहे.

भविष्यात उद्भवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यां रोखण्यासाठी मराठवाडा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांना प्रति एकर पन्नास हजार रुपये तातडीचे अनुदान देण्याच्या मागणी संदर्भातील लेखी निवेदन नायब तहसीलदार विजयकुमार पाटे यांना देण्यात आले आहे. यासोबत भीषण पाणीटंचाईच्या काळात जनावरांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी ईसापुर धरणाचे पाणी सोडण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. कामळज येथील शेतकरी सुदाम धर्माजी ढगे यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली असून पिडीत कुटुंबाला तात्काळ मदत करण्याची मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमुख बारडकर, जिल्हा सचिव गिरीश कोत्तावार, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, जिल्हा सरचिटणीस गंगाधर डांगे, महेश देशमुख, विश्वनाथ पवार निवघेकर, युवा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, नगरसेवक शेख खदीर, राजेश पवार निवघेकर, शिवानंद देवके, वेदांत शेवटे, चक्रधर खानसोळे, रमेश बोडके, भगवान पवार, विठ्ठल आचार्य, किशोर पिलेवाड, साई बोंडले, शरद पवार, गोविंद पवार यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी , शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारीपदी डॉ.चंद्रकांत पाटील रुजू

**कंधार** -कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारीपदी डॉ. चंद्रकांत पाटील हे रुजू झाले असून तालुका आरोग्य अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.



डॉ. चंद्रकांत पाटील हे एमबीबीएस, एमडी, पी.एस.एम. असून यापूर्वी त्यांनी कंधारचे ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून पाच वर्ष जबाबदारी सांभाळली आहे. त्यानंतर महागाव, जिल्हा यवतमाळ येथे उप जिल्हा रुग्णालयात कार्य केले आहे. कंधार येथे रूजू झाल्यानंतर मावळते प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश गावाले यांनी डॉ. चंद्रकांत पाटील यांचे स्वागत केले. यावेळी जि.प. बांधकाम विभागाचे वरिष्ठ सहाय्यक कुमार कांबळे यांनीही त्यांचे स्वागत केले. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# आरक्षणाची सोडत जाहीर होताच राजकीय समीकरणांना नवे वळण

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २३ सप्टेंबर -**

नायगांव तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी आरक्षणाची प्रक्रिया सुरू असून, दि. ०१ जुलै २०२५ रोजी झालेल्या आरक्षण सोडतीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे. त्यानंतर आज दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी ना.मा.प्र. (नागरिकांचा मागास प्रवर्ग) व खुल्या प्रवर्गातील सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली. तहसीलदार, नायगाव (खै.) यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या प्रक्रियेमुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये आगामी ग्रामपंचायत कारभाराचे नवे चित्र स्पष्ट झाले आहे.

आरक्षणाची सोडत जाहीर होताच संबंधित गावांमध्ये उत्सुकता, चर्चा आणि संभाव्य उमेदवारांच्या हालचालींना वेग आला आहे. अनेक गावांमध्ये महिला आरक्षण असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना नेतृत्वाची नवी संधी मिळणार आहे. तर काही गावांमध्ये खुल्या प्रवर्गासाठी सरपंच पद राखीव झाल्याने इच्छुकांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

आरक्षणानुसार गावांची यादी

अनुसूचित जाती चे प्रवर्गातील:- तलबीड, राजगडनगर, कोठाळा, पिंपळगांव, मुस्तापुर, गोदमगांव, सोमठाणा, खंडगांव, धुप्पा, टाकळी बु., कोकलेगांव, कोलंबी, गडगा, पाटोदा त.ब., मांजरम, कृष्णूर, मोकसदरा, बेटकबिलोली, दरेगांव, मनुर त.ब., अनुसूचित जाती महिला:-मुगांव, कहाळा बु.वजारवाडी डी, चारवाडी, टाकळी त.ब., मरवाळी तांडा, खैरगांव, निळेगव्हाण, ईकळीमोर, लालवंडी, कुंचोली, वाडी, हुस्सा, आलुवडगांव, मेळगांव, रुई बु., देगांव, औराळा, सावरखेड.अनुसूचित जमाती महिला:-मरवाळी/कोपरा, रातोळी.अनुसूचित जमाती:कार्ला त.मा./माहेगांव,केदारवडगांव ना.मा.प्र. महिला :- होटाळा, रुई खुर्द, शेळगांव छत्री, बळेगांव, हिप्परगा जा., सुजलेगांव, बरबडा, कहाळा खुर्द, सालेगांव खु., पळसगांव/टाकळगांव, गोळेगांव/नायगांव, शेळगांव गौरी. ना.मा.प्र.:कुंटूर, ईकळीमाळ, धनंज, घुंगराळा, वजीरगांव, अंतरगांव, नरसी, कांडाळा, अंचोली. खुला प्रवर्गात :-टाकळी त.मा., धानोरा त.मा., मांडणी, सातेगांव, नावंदी, रानसुगांव, डोंगरगांव, राहेर, हंगरगा, भोपाळा, बेंद्री आदी गावांसह सोडतीनुसार निश्चित करण्यात आलेली इतर गावे.

आरक्षण सोडतीनंतर आता गावागावातील इच्छुकांच्या अपेक्षा, स्थानिक राजकीय समीकरणे आणि नेतृत्वाच्या नव्या शक्यता याबाबत चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः महिला आरक्षण असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये महिलाच्य नेतृत्वाला प्रोत्साहन मिळणार असून, गावच्या विकासा चा धुरा आता नव्या चेहऱ्यांच्या हाती जाण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायत ही ग्रामीण लोकशाहीची सर्वात जवळची आणि महत्त्वाची पायरी मानली जाते. त्यामुळे सरपंच पदाचे आरक्षण केवळ राजकीय समीकरण बदलणारे नसून, गावाच्या विकासाच्या दिशेला आकार देणारे महत्त्वाचे वळण ठरते. आता आरक्षणाची स्थिती स्पष्ट झाल्याने गावकऱ्यांचे लक्ष आगामी राजकीय घडामोडींकडे लागले आहे.